cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१८६ | सोमवार, दि.२८ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## जरांगे पाटलांचा डावच राहणार केंद्रस्थानी !

मराठा आरक्षणासाठी दीर्घकाळ आंदोलन करणारे मनोज जरांगे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये कोणती भूमिका घेणार याबाबत सर्वांनाच लागलेली उत्सुकता अजूनही कायम आहे. ज्या ठिकाणी मराठा समाजाची ताकद जास्त आहे आणि उमेदवार हमखास निवडून येण्याची शक्यता आहे त्या ठिकाणी उमेदवार उभा करणे आणि ज्या ठिकाणी एससी आणि एसटी उमेदवाराने मराठा समाजाला पाठिंबा दिला आहे आणि त्या ठिकाणी मराठा समाजाचा प्रबळ उमेदवार नाही

## युगेंद्र पवार आज शरद पवारांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करणार

बारामती : बारामतीतून महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविणाऱ्या युगेंद्र पवार यांचा उमेदवारी अर्ज सोमवारी (दि. २८) दाखल केला जाणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार हे स्वतः यावेळी उपस्थित राहणार आहेत. दुसरीकडे महायुतीचे उमेदवार व उपमुख्यमंत्री अजित पवार हेही सोमवारी शक्तिप्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शरद पवार व अजित पवार हे दोघेही रविवारी (दि.२७) बारामतीत दाखल झाले आहेत. अजित पवार यांनी रविवारी राष्ट्रवादीच्या ताब्यात असलेल्या विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेत निवडणूक रणनिती आखली.

# पावसामुळे मराठवाड्यात पेरण्या खोळंबल्या

## नुकसानीसह रब्बी पेरणीची गती मंदावली



**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत केवळ ७९ हजार १३ हेक्टरवरच रब्बीची पेरणी झाली आहे. पावसाळ्याच्या अखेरच्या टप्प्यात व पावसाळा संपल्यानंतर आलेल्या जोरदार पावसाने अनेक भागात पेरण्या खोळंबविण्याचे काम केले आहे. याशिवाय पावसाने पिकांचेही बरेच मोठे नुकसान झाले असून यामुळे शेतकऱ्यांवर नव्याने संकट कोसळले आहे.**

मराठवाड्यातील लातूर व छत्रपती संभाजीनगर या दोन विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या आठ जिल्ह्यात रब्बीचे सर्वसाधारण क्षेत्र २१ लाख ५ हजार ११० हेक्टर इतके आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर कृषी विभागातील तीन जिल्ह्यातील ७ लाख ४१ हजार १८० हेक्टरसह लातूर कृषी विभागातील पाच जिल्ह्यातील १३ लाख ६३ हजार ९३० हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. लातूर कृषी विभागातील पाचही जिल्ह्यात सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत २२ हजार ९९१.५० हेक्टरवरच रब्बीची पेरणी झाली आहे. त्यामध्ये लातूरमधील ८५३ हेक्टरसह धाराशिवमधील ३६३५ हेक्टर, नांदेडमधील ३१६ हेक्टर, परभणीतील १३ हजार ८६४.५० हेक्टर तर हिंगोलीतील ४३२३ हेक्टरवरील प्रत्यक्ष पेरणी झालेल्या क्षेत्राचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर कृषी विभागातील तीन जिल्ह्यात ५६ हजार २२.९० हेक्टरवर रब्बीची पेरणी झाली आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत १२ हजार ६५० हेक्टर, जालनामध्ये ५३४४ हेक्टर तर बीडमध्ये ३८ हजार हेक्टर वर पेरणी झालेल्या क्षेत्राचा समावेश आहे. आता पाऊस उघडल्याने यापुढील काळात पेरणीची गती वाढण्याची शक्यता आहे.

## माजलगाव मधून अखेर मोहनराव जगताप यांनाच उमेदवारी



**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव विधानसभा मतदार संघामधून शरद पवार यांच्याकडून कोणाला उमेदवारी देईल याबाबत बरीच उत्सुकता लागली होती. अखेर आज रविवारी याचा खुलासा झाला असून मोहनराव जगताप यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.**

माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवाराबाबत सगळ्यांनाच उत्सुकता लागली होती. या ठिकाणी महायुतीकडून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने आमदार प्रकाश सोळंके यांना यापूर्वीच उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे प्रकाश सोळंके यांच्या विरोधामध्ये शरद पवार यांचा उमेदवार कोण असेल अशी चर्चा होत होती यामध्ये रमेशराव आडसकर, मोहनराव जगताप, नारायणराव डक यांच्या नावाची चर्चा होत होती. अखेर आज पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जाहीर केल्याप्रमाणे मोहनराव जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान रमेशराव आडसकर यामुळे नाराज झाले असून त्यांनी पक्षात प्रवेश घेऊनही त्यांचा उपयोग झाला नसल्याचे दिसत आहे. माहितीनुसार रमेशराव आडसकर हे सुद्धा अपक्ष लढण्याच्या तयारीत असल्याचे समजते. यामुळे माजलगाव विधानसभा निवडणुकीत चांगलाच रंग भरणार आहे.

# परळीत यंदा तगडी फाईट होणार !

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून धनंजय मुंडेंविरोधात राजेसाहेब देशमुख







**बीड । पतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून रविवारी (२७ ऑक्टोबर) विधानसभा निवडणुकीसाठी तिसरी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये सर्वाधिक हाय व्होल्टेजमध्ये असणाऱ्या परळी विधानसभा मतदारसंघातून उमेदवार देण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये असलेल्या कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात नुकताच पक्षप्रवेश केलेल्या राजेसाहेब देशमुख यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे फॅक्टर असलेल्या बीड जिल्ह्यामध्ये मराठा कार्ड पुन्हा एकदा बाहेर काढत शरद पवार यांनी मोठी खेळी केली आहे. त्यामुळे परळीमध्ये आता धनंजय मुंडे विरुद्ध राजेसाहेब देशमुख असा सामना रंगणार आहे.**

◀◀ पान २ वर

### धनंजय मुंडेंविरोधात आव्हानात्मक परिस्थिती

परळी विधानसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे राष्ट्रीय प्रवक्ते धनंजय मुंडे हे विद्यमान आमदार आहेत. महायुती सरकारमध्ये त्यांच्याकडे कृषीमंत्रीपद होते. लोकसभा निवडणुकीत भाजप नेत्या आणि आमदार पंकजा मुंडे यांचा पराभव झाला. आता मराठा आरक्षणाचा मुद्दा आणि पक्ष फुटीमुळे विधानसभा निवडणूकही कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना आव्हानात्मक जाणार असल्याचे बोलले जात आहे.

## वांद्रे स्टेशनवर चेंगराचेंगरीत ९ प्रवासी जखमी

मुंबई: वांद्रे टर्मिनसच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली. या झालेल्या चेंगराचेंगरीत ९ प्रवासी जखमी झाले. वांद्रे स्टेशनवरुन गोरखपूरकडे जाणाऱ्या एक्सप्रेसमध्ये चढताना प्लॅटफॉर्मलवर ही चेंगराचेंगरी झाली. यामध्ये २ प्रवासी गंभीर जखमी झाली आहेत. यामधील जखमी रुग्णांना स्टेशनवरील असणाऱ्या प्रवाशांना भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दिवाळीच्या सुट्टीमुळे उत्तर प्रदेश, बिहारकडे जाणाऱ्या मेल–एक्सप्रेस गाड्यांना मोठी गर्दी आहे. रविवारी पहाटे ५ वाजून १० मिनिटांनी बांद्रा टर्मिनसहून गोरखपूर एक्सप्रेस सुटणार होती. या एक्सप्रेसने प्रवास करण्यासाठी ◀◀ पान २ वर

## परळी मतदारसंघात महाविकास आघाडीत बंडखोरी अटळ

### युवक नेते राजेभाऊ फड यांनी अपक्ष लढावे; कार्यकर्त्यांचा आग्रह



**परळी वै. । प्रतिनिधी**

**२३३ परळी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने युवक नेते राजेभाऊ फड यांनी उमेदवारीची मागणी केली होती. मात्र ऐनवेळी पक्षाने वेगळाच उमेदवार दिल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठी नाराजी आणि संताप व्यक्त केला जात असून, लोकभावना आपल्या बाजूने असताना सुद्धा पक्षाने डावलले असल्याने राजेभाऊ फड यांनी स्वतंत्र निवडणूक लढवावी असा आग्रह धरला आहे. ही बाब लक्षात घेता सोमवार, दि.२८ ऑक्टोबर रोजी ते प्रचंड शक्तिप्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे.**

महाविकास आघाडीकडून परळी मतदारसंघाच्या उमेदवारीबाबत सस्पेन्स कायम ठेवण्यात आला होता. अखेर रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून तिसरी यादी जाहीर करण्यात आली. युवक नेते राजेभाऊ फड यांनी पक्षाकडे उमेदवारी देण्याची मागणी केली होती. मात्र ऐनवेळी उमेदवारी नाकारण्यात आल्याने कार्यकर्त्यांत मोठी नाराजी आणि संताप व्यक्त केला जातोय. विशेष म्हणजे फड यांच्या बाजूने मतदारसंघात अनुकूल ◀◀ पान २ वर

## माझ्या दहा वर्षाच्या कामाचे मोजमाप करा

### सामान्य माणसाचा तळतळाट लागेल असे वागलो नाही–आ.लक्ष्मण पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

मतदारसंघातील रस्ते, पाणी आणि वीज, या तीन महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष देऊन, हे अत्यावश्यक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.दहा वर्षात, ना टक्केवारी घेतली, ना कुणा विरोधकांना जाणीवपूर्वक त्रास दिला. सर्व सामान्य माणसाने दिलेल्या आमदारकीचा उपयोग केवळ मतदारसंघातल्या विकास कामासाठी उपयोगात आणली. कुणाचा ही तळतळाट लागेल, असे एक ही काम मी कधीही केले नाही. त्यामुळे, कार्यकर्त्यांच्या पाठबळावर



आणि सर्व सामान्य माणसाच्या पुण्याईवर अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात आहे. आता, मायबाप जनतेनेच न्याय द्यावा, असे भावनिक आवाहन आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केले. दरम्यान, गेवराई मतदारसंघातल्या ग्रामीण भागातील अंधार दूर व्हावा म्हणून, ८८ कोटी रू च्या लाईटच्या योजना मंजुर करून आणल्यात, अशी माहिती ही आमदार पवार यांनी यावेळी बोलताना दिली. रविवार ता. २७ रोजी गेवराई मतदारसंघात बुथ प्रमुखांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते. व्यासपीठावर शामबापु पवार, शिवराज पवार, ज्येष्ठ नेते सुरवसे काका, गंगाधर घुमरे, सतिष पाटील, सुंदर चव्हाण, दुषंत डोगरे, जे.डी. शहा, जान मोहम्मंद बागवान, देविदास फलके, शिवराज पवार, सुशील जवंजाळ, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे, ◀◀ पान २ वर

## सामाजिक उपक्रमामधून बिंदुसरा धरणाची स्वच्छता

### आनंदग्राम व रोटरीच्या संयुक्त विद्यमाने राबविला उपक्रम



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराजवळ असलेल्या बिंदुसरा धरण प्रकल्पाच्या परिसरात आनंदग्राम व रोटरीच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपक्रम राबवित बिंदुसरा धरणाची स्वच्छता करण्यात आली. दिनांक २७ ऑक्टोबर रोजी हा उपक्रम राबविण्यात आला.

नद्यांचे विद्रूपिकरण आणि प्रदूषण हे सगळीकडेच दिसून येते. बीड शहरातून बिंदुसरा नदी जाते शिवाय ◀◀ पान २ वर

## मी स्वत:ला ओबीसी लीडर म्हणून पाहत नाही–पंकजा मुंडे



**मुंबई । प्रतिनिधी**

**मी ओबीसी समाजात जन्मले, पण मी स्वत:ला ओबीसी लीडर म्हणून पाहत नाही. मी पक्ष पाहून काम केले, जात हा विषय डोक्यात आला नाही. मात्र सद्या असलेली परिस्थिती दुर्देवी वाटते. कोणत्याही समाजात वितुष्ट होऊ नये असे वाटते. खरे काय ते मांडायला हवे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या चौकटी मजबूत आहेत, त्या कोणी मोडू शकत नाही. ही दरी सांधणे खूप कठीण काम आहे. हे मनापासून ज्याला करायचेय त्याच्यासाठी ही कठीण परिस्थिती आहे, असे प्रतिपादन आ.पंकजा मुंडे यांनी केले.**

एका टिव्ही चॅनलला दिलेल्या मुलाखतीत त्या बोलत होत्या. यावेळी लोकसभा निवडणुकीतील पराभवाच्या बाबत पंकजा मुंडे म्हणाल्या, लढणे हे स्वत:साठी नसते तर ते विषयांसाठी असते. या निवडणुकीतून मी याचे मूर्तिमंत उदाहरण होऊ शकले. राजकीय परिस्थितीनुसार माझा मतदारसंघ मी हसत खेळत सोडला. इच्छा नसतानाही केवळ पक्षाचा आदेश म्हणून लोकसभा लढले. राजकारणामध्ये एकमेकांचा वैयक्तिक द्वेष ठेवता येत नाही. गोपीनाथ मुंडे ◀◀ पान २ वर

## खदानीत बुडुन विद्यार्थ्याचा मृत्यू



**परळी । प्रतिनिधी**

**इयत्ता दहावीत शिकत असलेल्या लिंबोटा तांडा येथील ऊसतोड मजुराच्या मुलाचा खदानीतल पाण्यात बुडुन मृत्यू झाल्याची घटना रविवार दि.२७ ऑक्टोबर रोजी सकाळी घडली.**

परळी तालुक्यातील लिंबोटा तांडा येथील ऊसतोड मजुरी करणाऱ्या लिंबाजी राठोड यांना तीन अपत्य असून सर्वात छोटा मुलगा योगेश हा पांगरी कॅम्प येथील संत भगवान बाबा विद्यालयात इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत होता रविवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेआठ वाजता पोहण्यासाठी आपल्या काही मित्रासोबत तांड्याशेजारील खदानी मध्ये गेला दहा वाजले तरी मुलगा परत न आल्याने नातलगांनी शोध सुरू ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ ऑक्टोबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०.०० क्विंटल | २,८०० | ३,२६० | २,९६१ |
| ज्वारी/हायब्रिड : ५९.०० क्विंटल | १,९०० | ३,१०० | २,३२९ |
| मका/लोकल :११.५० क्विंटल | २,२४१ | २,२४१ | २,२४१ |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | ६,६०० | ७,६७० | ७,३०२ |
| बाजरी: २५.५० क्विंटल | २,३११ | २,७४१ | २,५३२ |
| मुग : १४.०० क्विंटल | ६,००१ | ६,९०० | ६,६०० |
| सोयाबीन: ७०५.५० क्विंटल | ३,५०१ | ४,४५० | ४,१४४ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,००१ | ७,००० | ६,५०० |

# क्रिमीलेयर आणि उपवर्गीकरण हा आरक्षण संपवण्याचाच डाव

## ॲड.प्रकाश आंबेडकर यांचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

**अनुसूचीत जातींमध्ये क्रिमीलेयर आणि उप–वर्गीकरणाची अंमलबजावणी हा आरक्षण संपुष्टात आणण्याचा डाव असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटवरून केला.**

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे की, सामाजिक न्याय चळवळीला हा मोठा धक्का आहे. अनुसूचित जातींमध्ये क्रिमीलेयर आणि उप–वर्गीकरणाची अंमलबजावणी हा आरक्षण संपुष्टात आणण्याचा डाव आहे. महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने काँग्रेस, शिवसेना (उध्दव ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्या पाठिंब्याने प्रक्रिया सुरू केली. कर्नाटक आणि तेलंगणातील काँग्रेस सरकारने महाराष्ट्रापूर्वीच क्रिमीलेयर आणि उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू केली असल्याचा आरोप त्यांनी केला.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आरक्षण वाचवण्याऐवजी तुमची मते घेणारे पक्ष स्वत:च तुमचे घटनात्मक आरक्षण संपवत आहेत. वंचित बहुजन आघाडीनेच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा निषेध केला होता. भारत बंदच्या आवाहनाला पाठिंबा दिला होता आणि निकालाविरुद्ध पुनर्विलोकन याचिका दाखल केली होती. यावर काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी काय केले? असा सवालही त्यांनी केला. शेवटी प्रकाश आंबेडकर यांनी आवाहन करत म्हणाले की, या वेळी विधानसभा निवडणुकीत हुशारीने मतदान करा, नाहीतर बाबासाहेबांचे श्रम आणि बलिदान व्यर्थ ठरेल असा इशारा दिला.



cmyk

## अग्रलेख

# जरांगे पाटलांचा डावच राहणार केंद्रस्थानी !

मराठा आरक्षणासाठी दीर्घकाळ आंदोलन करणारे मनोज जरांगे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये कोणती भूमिका घेणार याबाबत सर्वांनाच लागलेली उत्सुकता अजूनही कायम आहे. ज्या ठिकाणी मराठा समाजाची ताकद जास्त आहे आणि उमेदवार हमखास निवडून येण्याची शक्यता आहे त्या ठिकाणी उमेदवार उभा करणे आणि ज्या ठिकाणी एससी आणि एसटी उमेदवाराने मराठा समाजाला पाठिंबा दिला आहे आणि त्या ठिकाणी मराठा समाजाचा प्रबळ उमेदवार नाही त्या ठिकाणी एससी, एसटी उमेदवाराला पाठिंबा देणे किंवा इतर सर्व ठिकाणी पाचशे रुपयांच्या स्टॅम्पवर जे उमेदवार मराठा आरक्षणाबाबत आश्वासन देतील त्या उमेदवाराच्या पाठीशी उभे राहणे, असा फॉर्म्युला त्यांनी दिला आहे.

हे समीकरण जाहीर करण्यापूर्वी जेव्हा त्यांनी बैठकीला उपस्थित असलेल्या समाज बांधवांना आपण काय करावे, असा प्रश्न विचारला होता तेव्हा काही लोकांनी आपण लढायला हवे असे सांगितले होते, तर काही लोकांनी आपण पाडायला हवे असे सांगितले होते. मराठा समाजाने लढाईची भूमिका घेतली तरी किंवा एखाद्या उमेदवाराला पाडायची भूमिका घेतली, तरी त्याचा फायदा कधी महायुतीला तर कधी महाविकास आघाडीला होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारे थेट राजकारणात न उतरता विचारपूर्वक हालचाली करण्याचा निर्णय जरांगे यांनी जाहीर केला आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आरक्षण आंदोलनाची ही जी चळवळ सुरू आहे ती बंद होता कामा नये किंवा कमकुवत होता कामा नये अशी एक अट त्यांनी समाज बांधवांना घातली आहे. जरांगे यांनी जाहीर केलेला हा फॉर्म्युला समस्त मराठी बांधवांना पटला की नाही हे समजणे जरी अवघड असले तरी २८८ जागांवर उमेदवार उभे करण्याचा जरांगे यांचा विचार मात्र नाही हे यावरून स्पष्ट होते. आगामी कालावधीमध्ये काही राजकीय समीकरणे जुळतात का हे पाहून त्यानंतर या फॉर्म्युल्याच्या आधारे निर्णय घेण्यात येईल असे त्यांनी म्हटले यामुळेच त्यांच्या भुमिकेकडे लक्ष लागलेले आहे.

महाविकास आघाडी आणि महायुती यांच्या व्यतिरिक्त राज्यात एक तिसरी आघाडी आली आहे. त्यांनीही जरांगे आमच्यासोबत येतील असा दावा केलेला आहे, त्यामुळे जरांगे कोणत्या ठिकाणी कोणती भूमिका घेतील यावरच पुढचे गणित ठरणार आहे. खरे तर गेल्या काही दिवसांमध्ये भाजपामधील मराठा नेते किंवा लक्ष्मण हाके यांच्यासारखे ओबीसी नेते किंवा राष्ट्रवादीमधील छगन भुजबळ यांच्यासारखे नेते यांनी मनोज जरांगे यांना जाहीर आव्हान देऊन सर्व २८८ ठिकाणी उमेदवार उभे करावेत असे सुचवले होते. पण मुळात २८८ मतदारसंघ असलेल्या महाराष्ट्रावर पूर्वीपासूनच मराठा समाजाचा वरचष्मा आहे आणि दीडशे पेक्षा जास्त आमदार हे मराठा समाजाचेच आहेत. अनेक वर्षे राजकारणात असलेली अनेक मराठा घराणीच महाराष्ट्राचे राजकारण चालवत आहेत. पिढ्यानपिढ्या आजोबांपासून आता नातवापर्यंत विधानसभेच्या निवडणुका लढवल्या जात आहेत. बहुतेक मुख्यमंत्री मराठा समाजाचे होते. साहजिकच जरी कोणाला पाडायचे ठरवले तरी निवडून येणारा आमदार हा मराठा आमदार असणार आहे याची जाणीव कदाचित जरांगे यांना झाली असावी. म्हणून सर्वंकष पद्धतीने उमेदवार पाडण्याची भूमिका न घेता हा त्रिसूत्री फॉर्म्युला राबवण्याचा निर्णय त्यांनी घेतला असावा. आपल्या भूमिकेमुळे महाविकास आघाडी किंवा महायुती यांना कोणताच फायदा व्हायला नको असा त्यांचा विचार असावा. पण ज्या प्रकारे त्यांनी एससी आणि एसटी उमेदवारांना मराठा समाजाचा पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे ते पाहता ओबीसी समाजाच्या उमेदवारांना मात्र त्यांचा पाठिंबा असणार नाही हे उघड आहे.

निवडणुकीच्या कालावधीमध्ये आश्वासन देण्यात वाक्बगार असलेले राजकीय पक्षांचे नेते पाचशे रुपयांच्या स्टॅम्पवरसुद्धा अशा प्रकारचे आश्वासन बिनधास्त देऊ शकतील यात वेगळे काही नाही, याची जाणीव जरांगे यांनाही होती म्हणूनच त्यांनी यात बदल करीत बॉन्ड घेण्याचे नाकारले आणि मी मागेल तेंव्हा आणि त्यांनीच बॉन्ड द्यायचे असे म्हटले आहे. गेल्या काही दिवसांत काही मुस्लीम समाजातील नेते आणि एमआयएमचे नेते यांनीसुद्धा त्यांची भेट घेतली आहे.

राजकीय पक्षांकडून आता उमेदवाऱ्या वाटून झाल्या आहेत. अनेकांनी फॉर्महीही भरले आहेत. यामुळे जरांगे पाटील यांच्याही समोर चित्र स्पष्ट झाले आहे. यामुळे त्यांना निर्णय घेणे सोपे होणार आहे. मात्र एकूण परिस्थिती बघितली तर जरांगे पाटील यांच्या भुमिकेचा परिणाम दिसून येणार असून तेच निवडणुकिच्या केंद्रस्थानी असणार आहेत. त्यांना आपल्याला विरोध करणाऱ्यांना धडा शिकवताना आगामी कालावधीमध्ये मराठा आरक्षण आंदोलनाची तीव्रता कमी होणार नाही याचीही दक्षता घ्यावी लागणार आहे.

## जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात अनाथ, वयोवृद्ध, विकलांग गरजूच्या सेवेतून मानवतेचे दर्शन–बी.के.अहिरे

बीड । प्रतिनिधी

**भारतीय संस्कृतीत दानधर्माला मोठे महत्त्व असून दान हे योग्य गरजूंपर्यंत सत्कार कार्यासाठी जावे ही अपेक्षा दात्यांच्या असते. दीपावली सण नजीक असून सन उत्सवाचा आनंद इतरांना सामावून घेण्यातच जास्त असतो तोच वारसा बीड शहरातील अंबिका बचत गट या संस्थेने जोपासत जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये अंबिका बचत गट, बीड. यांच्या माध्यमातून सर्व अनाथ, बेघर ज्यांना कोणीही नाही अशा सर्वांना दीपावली निमित्त फराळाचे वाटप आणि बेघर निवारा केंद्रास आर्थिक मदत करण्यात आली तसेच श्री बी. के. अहिरे सर यांनी एक वेळेचे अन्नदान केले.**

या कार्यक्रमास प्रा.नखाते, श्री विलास लेंभे, श्री सोमनाथ लेंभे, श्री डी एन नागरगोजे, श्री वा भा दारेवार, श्री डोईफोडे सर आणि जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील श्री वंजारे सर, श्री वैद्य सर, श्रीमती छाया सरोदे आणि मोठ्या प्रमाणात अनाथ लाभार्थी उपस्थित होते. जिव्हाळा परिवाराकडून अंबिका बचत गटाचे सर्व सदस्य यांचे मनापासून आभार आणि खूप खूप धन्यवाद व्यक्त करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना बी.के अहिरे म्हणाले की बीड शहराच्या मध्यवर्ती असणाऱ्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात अनाथ विकलांग मतिमंद गतिमंद गरजू व्यक्तींसाठी अखंड सेवा चालू असून या गरजू व्यक्तीसोबत दीपावलीचा आनंद अधिक वाढतो त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसतो हे समाधान पैशात नाही. येथील गरजूंना अन्न– वस्त्र– निवारा, आरोग्य , मनोरंजन यासह मूलभूत गरजा जिव्हाळा बेघर निवारा केंद्र बीड या संस्थेच्या माध्यमातून दिल्या जातात हे प्रत्यक्ष पाहण्याचा योग आम्हाला आला आणि या लोकांशी संवाद साधण्याचे भाग्य मिळाले. वाढत्या वयानुसार घरातील व्यक्ती ही टाकाऊ नसते तर ती घराचे घरपण टिकून ठेवते त्यामुळे घरातील ज्येष्ठ व्यक्ती, विकलांग, गतिमंद, मतिमंद या गरजूंचा समाजातील प्रत्येकाने सन्मान करण्याची आवश्यकता असल्याचे ते याप्रसंगी म्हणाले.

## बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी अध्यक्ष पदी राहुल सोनवणे

केज । प्रतिनिधी

**बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी जिल्हा अध्यक्ष पदी काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्र महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे उपाध्यक्ष नाना गवांडे दिले.**



मागच्या दोन दिवसापूर्वीच जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचेकडे आपला राजीनामा दिला होता त्या अनुषंगाने दि.२७ रोजी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी जिल्हा अध्यक्ष पदावर उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राहुल सोनवणे हे विद्यार्थी दशेपासून काँग्रेस मध्ये काम करत आहेत एन एस यु आय चे प्रदेश सरचिटणीस या सह जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष पदावर देखील त्यांनी काम पाहिले आहे. उच्च शिक्षित, संयमी व सुस्कृत राजकारणी म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख आहे. त्यांच्या या निवडीबद्दल काँग्रेसच्या नेत्या खा.सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोक पाटील, आदित्य पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## चोपणवाडी शिवारात तीन एकर ऊस जळून खाक

दिंद्रुड । प्रतिनिधी

**दिंद्रुड महसूल विभाग चोपणवाडी शिवारातील तीन एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना रविवारी सकाळी ११ वाजे दरम्यान घडली. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचा शेतकऱ्याचा आरोप असून लवकरात लवकर मदत मिळण्याची मागणी होत आहे.**

सुबाबाई रंगनाथ तिडके यांचे दिंद्रुड महसूल मंडळातील चोपनवाडी शिवारात गट नंबर ९३ या शेतात तीन एकर ऊस लागवड केलेला आहे. या शेतातुन महावितरणच्या ३३ केव्ही ची लाईन गेलेली आहे. विद्युत खांबाला वेल लगडलेला असल्याने स्पार्किंग होऊन पडलेल्या ठिणग्यात शेतकऱ्याचा तीन एकर ऊस जळाल्याची घटना शनिवारी सकाळी ११ वाजे दरम्यान घडली. दरम्यान स्थानिक शेतकऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत सर्व ऊस जळून खाक झाला होता.



## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुर्डी गणप्रमुखपदी सोमिनाथ सानप यांची नियुक्ती

### तुतारीकडे युवकांची मोठ्या संख्येने ओढ...



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**तालुक्यातील तुतारी मध्ये युवक शरदचंद्र पवार यांच्या विचारांधारावर व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात मोठ्या संख्येने येत असून याच अनुषंगाने सुर्डी येथील युवा नेते सोमिनाथ सानप यांनी प्रवेश केला असून त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुर्डी गणप्रमुखपदी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष राहुल काकडे व अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ.नदीम शेख यांच्या हस्ते रविवार दि २७ ऑक्टोबर रोजी नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली.**

तालुक्यातील धडाडीचे कार्यकर्ते तथा युवा नेते सोमिनाथ सानप यांच्या सुर्डी गुणांमध्ये सामाजिक कार्य करत असून त्यांची दखल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने दखल घेतली असून त्यांची निवड प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांच्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष राहुल काकडे, डॉ अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख यांच्या हस्ते सोमिनाथ सानप यांची नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली.यावेळी अल्पसंख्याक विभागाचे आष्टी शहराध्यक्ष जिशान सय्यद, तोफीक शेख, अदनान सय्यद, अरबाज कुरेशी, सचिन पवार,आकाश गर्जे, बबन गर्जे, सुनील गर्जे, अजिनाथ साबळे, बबन कांबळे, भाऊसाहेब कांबळे, राहुल कांबळे, सतीश, अजित आदी युवक कार्यकर्ते उपस्थित होते.

## आंनदग्रामला दिवाळीनिमित्त महिंलाकडून मदतीचा आधार

### माजलगाव येथील जय गजानन ग्रूपचा उपक्रम



बीड । प्रतिनिधी

समाजातील वंचित घटकांतील व्यक्तींनाही दिवाळीचा आनंद घेता यावा, त्यांचीही दिवाळी गोड व्हावी यासाठी माजलगाव शहरातील जय गजानन पारायण ग्रुपच्या महिला सरसावल्या आहेत. रविवार दि.२७ रोजी बीड जवळील इंन्फट इंडिया (आनंदग्राम) येथील एचआयव्ही ग्रस्त मुला–मुलींची दिवाळी जय गजानन पारायण महिला ग्रुपने गोड करत आंनदग्रामला मदतीचा आधार दिला आहे. आपल्या सभोवतालच्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. याच समाजातील गरीब घटकांसाठी आपल्याच आनंदातील काही क्षण त्यांच्यासाठी देणार्या भावनेतून 'त्यांनी' वंचित, गरजू आणि दीनदुबळ्यांची दिवाळी मिठाई, फराळाच्या मसालेदार आणि गोड पदार्थासह इतर काही लागणार्या वस्तु देउन या एचआयव्हीग्रस्त मुला–मुलींची दिवाळी आनंदमयी केली आहे. देणार्यांने देत जावे, घेणार्यांने घेत जावे या उक्तीप्रमाणेच हा महिला ग्रुप मागील ६ वर्षांपासून असे समाजउपयोगी उपक्रम राबवून अनेक लोकांच्या चेहर्यावरच्या हास्याचे कारण बनत आहे. समाजातील सधन व्यक्तींनी गरिबांच्या घरी जाऊन मिठाई व दिवाळी फराळ वाटप करून दिवाळी आनंदाने साजरी करण्याचे आवाहन या महिला ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

### दिवाळी किटमध्ये काय

जय गजानन ग्रुपच्यावतीने जवळपास ८० विद्यार्थ्यांना दिवाळी किट वाटप करण्यात आली. ज्यामध्ये भडंग चिवडा, मका चिवडा, मसाला शेव, बालुशाही, लाडू, जिलेबी, बिस्कीट, चॉकलेट, कूरकूरे यासह दिवे आणि फटाकडे असे सामान दिले होते.

### वस्तुंची मदत

आनंदग्राम येथे जय गजानन ग्रुपच्यावतीने काही आवश्यक वस्तुंचीही मदत करण्यात आली. यामध्ये इन्वर्टर, मिक्सर, स्क्रीट लाईट, डस्टबीन, खुर्च्या यासोबत आणखी काही वस्तु देण्यात आल्या.

## पान १ वरून...

### परळीत यंदा तगडी

बीडच्या परळी विधानसभा मतदारसंघातून धनंजय मुंडे यांच्या विरोधात शरद पवार नेमकी कोणती खेळी खेळून उमेदवार देतात? त्याची उत्सुकता लागली होती. शरद पवारांनी या मतदारसंघात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे परळी विधानसभा मतदारसंघात ओबीसी विरुद्ध मराठा हा संघर्ष पाहायला मिळणार आहे. राजेसाहेब देशमुख हे काँग्रेसचे विद्यमान जिल्हाध्यक्ष होते. मात्र, काँग्रेसला खिंडार पाडत शरद पवारांनी त्यांचा प्रवेश राष्ट्रवादीमध्ये करून घेतला आणि हा प्रवेश झाल्यानंतर त्यांना परळी मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली. मुंडे यांनी गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर मुंडेंच्या विरोधात कोणता उमेदवार देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आता अशातच पवारांची खेळी या मतदारसंघात महत्त्वाची मानली जाते आहे.

-------------

### माझ्या दहा वर्षाच्या कामाचे

राजेंद्र राक्षसभुवनकर, दादासाहेब गिरी, सतिष दाभाडे,यांची उपस्थिती होती. गेल्या दहा वर्षात गेवराई मतदार संघातील जनतेची सेवा करताना प्रामाणिक प्रयत्न करून ग्रामीण भागातील प्रत्येक गावात विकास कामे केली आहेत. परंतु , राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता मी या राजकारणापासून दूर राहाव म्हणून मी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आपल्या आग्रहाखातर मला पुन्हा या निवडणुकीच्या मैदानात यावे लागले आहे. मागील काळात केलेली विकास कामे प्रामाणिक कार्यकर्ता अन गोरगरीब जनता हीच आपली ताकद असून याच ताकदीच्या जोरावर आपण अपक्ष उमेदवार म्हणून या निवडणुकीच्या मैदानात उतरलो असून येत्या निवडणुकीत पुन्हा एकदा आपण मला संधी देताल असा विश्वास आ. पवार यांनी व्यक्त केला मी, पक्ष सोडला असला तरी आपल्या तालुक्यातील जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही. गेल्या दहा वर्षात आपण तालुक्यातील गावागावात विकासाची कामे केली. आज तालुक्यातील असे एकही गाव नाही जिथे आपले विकास काम नाही आणि याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा पंडित मुक्तीचा नारा देऊन तुमच्यासाठी या विधानसभा निवडणुकीच्या मैदानात अपक्ष उमेदवार म्हणून उतरत आहे. आपण अपक्ष जरी असलो तरी या मतदार संघातील गोरगरीब मायबाप जनता व आनेक अदृश्य शक्ती आपल्या सोबत आसून हा मतदार संघ आपण कोणाच्या ताब्यात जाऊ देणार नाही म्हणून, आपण सर्वांनी पुन्हा एकदा ताकतीने कामाला लागा विजय आपलाच. असे आवाहन ही त्यांनी केले यावेळी प्रकाश सुरवसे,गंगाधर घुमरे, युवा नेते शिवराज पवार, देविदास फलके, शिनुभाऊ बेद्रे, जेडी शहा, सतीश पाटील, दुशंत डोंगरे, महेश चेके, ॲड.सुरेश पवार, सुंदर चव्हाण, यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून पुन्हा एकदा आ. लक्ष्मण पवार यांना विधानसभेत पाठवू असा विश्वास दिला. या बैठकीला सर्व पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**गंगाधर घुमरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती**

आ.लक्ष्मण पवार यांनी गेवराई विधानसभेच्या मैदानात अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केल्यानंतर त्यांना मतदार संघातून अनेकांचा पाठिंबा मिळत आहे. आज गेवराई येथे झालेल्या कार्यकर्ता संवाद बैठकीत पिंपळनेर सर्कलचे माजी जि.प. उपाध्यक्ष गंगाधर घुमरे यांच्यासह सतीश पाटील, सुंदर चव्हाण यांच्यासह अनेक दिग्गजांची उपस्थिती दिसून आल्याने आ.लक्ष्मण पवार यांची ताकद वाढत असल्याचे दिसत आहे.

**प्रामाणिक कार्यकर्ता हीच अण्णांची ताकद**

तळागाळातील प्रामाणिक कार्यकर्ता आणि गोरगरीब जनता हीच अण्णांची खरी ताकद असल्याने आपल्याला कुठल्या पक्षाची गरज नाही. गेल्या दहा वर्षात मतदार संघातील गावागावात विकासाची गंगा आणण्याच काम अण्णांनी केलं आहे. आणि हे सर्व तुमच्या पाठिंब्यावर झालेलं आहे. कारण या मतदार संघातील सर्व सामान्य गरगरीब जनता व प्रामाणिक कार्यकर्ता हीच अण्णांची ताकद आसल्याचा विश्वास युवा नेते शिवराज पवार यांनी व्यक्त केला.

---------

### परळी मतदारसंघात महाविकास

असे वातावरण होते. लोकांचा त्यांना सकारात्मक प्रतिसाद असून त्यांनी विधानसभा निवडणूक लढवावी असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात बंडखोरी अटळ मानली जात असून, राजेभाऊ फड सोमवारी सकाळी ११ वाजता आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

-----------

### वांद्रे स्टेशनवर चेंगराचेंगरीत ९

प्रवासी रात्रीपासूनच स्थानकात आले होते. एक्सप्रेस प्लॅटफॉर्मला लागताच ट्रेनमध्ये चढण्यासाठी प्रवाशांनी एकच गर्दी केली. प्रवाशांची धावपळ झाल्याने चेंगराचेंगरीची घटना घडली.

-----------

### खदानीत बडुन

केला खदानी शेजारी असलेल्या त्याच्या कपड्यावरून खदानीतील २५ फूट खोल पाण्यात त्याचा शोध घेतला सकाळी ११ वाजता त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला परळी उपजिल्हा रुग्णालयात ज्ञवविच्छेदन करण्यात आल्यानंतर लिंबूटा तांडा येथे त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

-------------

### मी स्वत:ला ओबीसी लीडर

यांची साथ सोडून धनंजय मुंडे त्यावेळी राष्ट्रवादीत गेले होते, पण आज मी त्यांचा प्रचार करते आहे तेही माझ्या प्रचाराला आले होते. मी राजकारणामध्ये कधीच कोणावर वैयक्तिक टीका केली नाही की कोणाचा तिरस्कार केला नाही. आता आमच्या दोघांचे पक्ष एकत्र काम करीत असल्याने पक्षासाठी आम्हाला काम करावेच लागते. यंदाच्या दसरा मेळाव्यासाठी सुद्धा धनंजय मुंडे उपस्थित होते. याशिवाय अजितदादा पवार हे सुद्धा माझ्या प्रचाराला आले होते. तसे बघितले तर राष्ट्रवादी आणि आम्ही एका मंचावर येऊन असे कधी वाटले नव्हते मात्र राजकारणामध्ये अशा गोष्टी घडत असतात, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. यावेळी त्यांनी माजी खा. प्रीतम मुंडे यांच्या भविष्याबद्दलही सांगितले. त्या म्हणाल्या मोठी बहीण म्हणून माझी काही जबाबदारी आहे आणि काही दिवसांत त्यांचे चांगल्या पद्धतीने पुनर्वसन करण्यात येईल. राज्यात महिला मुख्यमंत्री याबाबतही त्यांनी आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या महिला मुख्यमंत्री यांची चर्चा सुरू झाली की माझे नाव येते याचा मला आनंद वाटला पाहिजे पण दुर्दैवाने केवळ चार ते पाच महिलांचे नाव पुढे येते. खरंतर २० –२५ महिन्याचे नाव आले तर अधिक आनंद वाटेल. याचा अर्थ असा की, अनेक महिला राजकारणात सक्रिय झाल्या पाहिजेत. यावेळी त्यांनी मराठा विरुद्ध ओबीसी या संघर्षावरही आपले म्हणणे मांडले. त्या म्हणाल्या मी स्वतःला ओबीसी नेता समजत नाही जरी मी ओबीसी समाजात जन्माला आले तरी. कारण मी कधीच जात–पात मानत नाही, आजवर माझ्या डोक्यात तसा कधीच विचार आला नाही. कोणत्याही समाजामध्ये वितूष्ट असणे हे चुकीचे आहे. सध्या मात्र परिस्थिती थोडीशी बदलली असून हे दुर्दैवाचे आहे. सर्व समाजाने एकत्र नांदण्याची गरज असून, बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाच्या चौकटीत सगळेजण बसतात त्यामुळे एकमेकांना विरोध करण्याचा प्रसंग येऊ नये. निर्माण झालेली दरी भरून काढण्याची गरज आहे मात्र ते तेवढे सोपे सुद्धा नाही.

-------------

### सामाजिक उपक्रमामधून

याच नदीवर पाली येथे बिंदुसरा धरण प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. या सगळ्या परिसरामध्ये बिंदुसरामध्ये बरीच घाण साचली होती. हा परिसर स्वच्छ झाला पाहिजे या सामाजिक जाणिवेतून आनंदग्राम व रोटरीच्या संयुक्त विद्यमाने बिंदूसरा धरणात उतरून सर्व प्लास्टिक, घाण, कचरा गोळा करून धरण स्वच्छ करण्यात आले. यामध्ये एनएसएस, जलसंपदेचे अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्तेही सहभागी झाले होते. सर्व ठिकाणचे प्लास्टिक, पुड्या, कचरा, बाटल्या, पिशव्या आणि गणेश विसर्जनाचे मांगल्यातील घनकचरा हे सगळे एकत्र करून बाहेर काढण्यात आले आणि ते नष्टही केले. यावेळी रोटरीच्या वतीने धरण परिसरामध्ये कचराकुंडही ठेवण्यात आल्या. या परिसरात येणाऱ्या पर्यटकांनी या कुंड्यांचा योग्य वापर करून घाण कचरा करण्याचे टाळावे असे आवाहन करण्यात आले आहे. हा उपक्रम राबविण्यासाठी इन्फंटचे दत्ता बारगजे आणि रोटरीच्या सदस्यांनी पुढाकार घेतला.

------------

# जिल्हा रुग्णालयामध्ये रक्ताचा तुटवडा

## नागरिक, रक्तदाते आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज



बीड - येथील जिल्हा रुग्णालयामध्ये रक्ताचा तुटवडा येत असल्याने गरजू रुग्णांना मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे. त्यामुळे बीड शहरासह जिल्ह्यातील नागरिक, रक्तदाते आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.बीड येथील जिल्हा रुग्णालय हे खऱ्या अर्थाने गरिबांचा आधार आहे. असंख्य नागरिक दररोज या रुग्णालयांमधून बरे होऊन घरी परततात. अपघात, वयोवृद्ध नागरिक यांना जिल्हा रुग्णालयात आणल्यानंतर कधी कधी रक्ताची अत्यंत गरज पडते. अशावेळी रुग्णालयामध्ये रक्त उपलब्ध असल्यावर अडचण येत नाही मात्र सध्या जिल्हा रुग्णालयामध्ये रक्ताची कमतरता असल्याची माहिती असून रक्तदाते आणि सामाजिक संस्थांनी रक्तदान शिबिर घेण्यासाठी पुढाकार घेण्याची खरी गरज आहे. सामाजिक संस्थांनी रक्तदान शिबिर आयोजित करण्यासाठी घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४



# दिवाळीच्या साहित्याने दुकाने सजली

## मातीच्या पारंपरिक व नक्षीदार आधुनिक पणत्या, कंदील व इतर वस्तू बाजारात दाखल



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिव्यांचा सण असलेली दीपावली अवघ्या काही दिवसांवर आली असून यानिमित्त घरात रोषणाईसाठी पणत्या खरेदी करण्याची लगबग सुरू झाली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील अनेक ठिकाणी पणत्या विक्रेते अनेक दिवसांपासून पणत्या व इतर साहित्य विक्री करीत आहेत. अलीकडे मातीच्या पणत्यांची जागा मेणाच्या पणत्या आणि इलेक्ट्रॉनिक रोषणाईने घेतली असली, तरी पारंपरिक जुनेजाणते नागरिक दिवाळीत घरी मातीच्या पणत्या लावल्याशिवायदिवाळी साजरी करीत नाहीत. यामुळे दिवाळीत पणत्यांचे महत्त्व कायम असून बाजारपेठा नानाविध

प्रकारच्या, आकराच्या, नक्षीच्या पणत्यांची सजल्या आहेत. सध्या जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये राज्यासह परराज्यातील पणत्यांची आवक वाढल्याचे निदर्शनास येत आहे. दिवाळीत घर, दुकानाच्या चोहीकडे पणत्यांची आरास केली जाते. यासाठी लहान पणत्यांना पसंती मिळते.

बीड जिल्ह्यात खूप कमी प्रमाणात मातीच्या वस्तू बनवणारे उत्पादक आहेत. हे उत्पादक गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश

आदी राज्यातून माती आणून त्यात आपल्याकडील माती मिसळून पणत्या व इतर वस्तू तयार करतात. तयार केलेल्या वस्तू भट्टीमध्ये भाजून तयार झाल्यावर त्यावर प्रक्रिया करून ते बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करतात. सध्या घाऊक बाजारात साध्या पणत्या १० ते ४० रुपये डझनने

उपलब्ध असून नक्षीकाम, पानातल्या पणत्या, नारळातील पणत्या, मोठ्या पणत्या पंचमुखी पणत्या आदी अशा विविध प्रकारच्या पणत्या १२० ते २५० रुपये जोडी व डझन प्रमाणे उपलब्ध आहे; तर किरकोळ बाजारात साध्या ते चांगल्या प्रतीच्या पणत्या २० ते ३० रुपये जोडी तसेच डझनानरही उपलब्ध आहेत. मातीच्या वस्तू, पणत्या व्यावसायिक गेल्या अनेक दिवसापासून विविध मोक्याच्या ठिकाणी या पणत्या व इतर वस्तू विक्री करण्यासाठी बसले आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार दिवाळीच्या महिनाभर आधीपासून पणत्या बनवण्याचे काम सुरू करण्यात येते.

मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी माती, मजूर आणि अधिक मेहनत लागत असल्यामुळे उत्पादकांकडून वस्तू बनवण्यापेक्षा घाऊक बाजारातून तयार वस्तू घेऊन किरकोळ विक्री करण्याचे प्रमाण वाढत आहे. यासाठी बाहेर राज्यातून पणत्यांची आवक वाढली आहे. हाताने तयार केल्या जाणार्या पणत्यांपेक्षा साच्यामध्ये तयार होणार्या विविध नक्षीच्या आणि विशेषतः विविध रंगांनी रंगवलेल्या आकर्षक पणत्यांना ग्राहकांची पसंती मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून माजलगाव तालुक्यात बाहेर राज्यातील पणती दाखल झाली असून बाजारात २० ते ३० रुपये जोडी व १५० ते ३०० रुपये डझन किमतीच्या पणत्या उपलब्ध आहेत. यामध्ये लहान पासून पंचमुखी आणि मोठ्या आकाराच्या पणत्या उपलब्ध आहेत. शिवाय विविध रंगाच्या आणि नक्षी असलेल्या पणत्यादेखील उपलब्ध आहेत.

पान ६ वरुन...

## राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भास्करराव अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, युवानेते अक्षय गोरंट्याल, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांगडे, कल्याणराव दळे, प्रमोद रत्नपारखे, विनयकुमार कोठारी, संजोग हिवाळे, बदर चाऊस, बाला परदेशी, माजी गटनेते गणेश राऊत, अब्दुल रऊफ परसुवाले, अब्दुल रफिक, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष वसंत जाधव, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार, दुर्गेश काठोठीवाले, मनकर्णाताई डांगे, बाबुराव पवार, राम सावंत, दिपक भुरेवाल, दिनकर घेवंदे, किशोर मघाडे, अमेर पाशा, किशोर मगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना डॉ. शर्मा म्हणाले की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही मुळ पक्षांसह त्यांची चिन्ह बंडखोरांनी पळवून नेल्यानंतर देखील लोकसभा निवडणुकीत नविन चिन्ह असतांना या पक्षांना मिळालेले यश सर्व सामान्य जनतेशी असलेली बांधिलकी अधोरेखीत करणारी आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत देखील इंडिया आघाडी राज्यात सत्तेत येईल असा विश्वास व्यक्त करून राज्यातील महायुती सरकारचे पाय खोलात गेल्यामुळे जाता-जाता त्यांनी लाडकी बहिन योजनेचा डाव टाकून कसाबसा बचाव करण्याचा प्रयत्न केला असला तरी राज्यातील जनता किती जागृत आहे हे लोकसभा निवडणुकीत दिसून आले असून या निवडणुकीत देखील तिच परिस्थिती कायम राहील असा ठाम विश्वास डॉ. पी. सी. शर्मा यांनी यावेळी व्यक्त केला. तत्पुव जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, बाबुराव पवार, संजोग हिवाळे यांची समयोचित भाषणे झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद यांनी केले. संचलन राम सावंत यांनी तर शेवटी गणेश राऊत यांनी आभार मानले. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विचारांच्या मागे निष्ठेने उभे रहा : भास्करराव अंबेकर

यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील आणि शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी अत्यंत सुसंस्कृत राजकारण केले आहे. त्यांच्या विचारांच्या पाठिमागे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी निष्ठेने उभे रहावे असे आवाहन शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले. राज्यातील सद्यस्थितीत सुरू असलेल्या राजकीय परिस्थितीवर अंबेकर यांनी आपल्या भाषणातून जोरदार टिका केली. अत्यंत खालच्या स्तरावर जावून राजकारण करण्याला प्राधान्य दिले जात असल्याबद्दल शोकांतीका व्यक्त करून एकीकडे लाडकी बहिनीसारखी योजना राबवायची आणि दुसरीकडे बालिकांसह महिलांवर दिवसाढवळ्या अत्याचार वाढत असून ही परिस्थिती बदलण्यासाठी जालन्यातून आ. कैलास गोरंट्याल यांना विजयी करण्यासाठी परिश्रम घ्यावे लागणार आहेत. सोयाबिन, कापसाचे भाव कोसळल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी राज्यात परिवर्तन आवश्यक असल्याचे सांगून अंबेकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ''ना खाऊंगा ना खाने दुंगा'' या घोषणेची आपल्या भाषणातून चांगलीच खिल्ली उडवली. कोणतेही काम टक्केवारी शिवाय होत नाही अशी परिस्थिती जवळपास सर्वच ठिकाणी निर्माण झालेली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी आ. कैलास गोरंट्याल यांना विजयी करण्याचे आवाहन अंबेकर यांनी केले.

गद्दारांना शिवसैनिक धडा शिकवतील - आ. कैलास गोरंटयाल

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी गद्दारी करणाऱ्यांना या निवडणुकीत शिवसैनिक निश्चितपणे धडा शिकवतील असा विश्वास इंडिया महाविकास आघाडीचे जालना विधानसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंटयाल यांनी येथे बोलतांना व्यक्त केला. ते म्हणाले की, काँग्रेस पक्षाकडे आपल्यासह अनेकांनी तिकीट मागितले होते. मात्र, तिकीट आपल्याला मिळाले. उमेदवारी मागणे हा प्रत्येकाचा अधिकार असून त्यांच्याशी आपले कोणतेही वैर नाही. विधानसभेची निवडणूक भयमुक्त वातावरणात झाली पाहिजे यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे. आतापासूनच दादागिरी, गुंडगिरीचे प्रकार सुरू झाले असून त्यांची शिकवण तशी आहे. त्यामुळेच त्यांनी गद्दारी केल्याचा टोला आ. कैलास गोरंटयाल यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्याला लगावला आहे. जालन्यासह जिल्ह्यातील मविआ उमेदवार निवडून आणायची जबाबदारी आपल्या सर्वांची असून आघाडीतील सर्व घटक पक्षांनी आघाडीचा धर्म पाळावा अशी अपेक्षा शेवटी गोरंटयाल यांनी व्यक्त केली.

# बीड जिल्हा राष्ट्रीय ओबीसी महासंघाची बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या आढावा बैठकीचे नियोजन जिल्हा अध्यक्ष संजय तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई येथे नुकतेच करण्यात आले होते. बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांची कार्यकारणी याप्रसंगी जाहीर करण्यात आली.

ओबीसी साठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाने जे कार्य केले याबद्दल सखोल चर्चा तसेच येणाऱ्या काळात महासंघाच्या वतीने विविध मागण्या राज्य शासन तथा केंद्र शासनाकडून मंजूर करून घेण्या साठी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे सर यांच्या कडून चालू असलेले प्रयत्न याबदल विशेष चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने चालू असलेल्या कार्याला प्रेरित होऊन असंख्य ओबीसी बांधवानी महासंघात प्रवेश केला आहे. जिल्हा तथा तालुका स्थरावर विविध पदावर नियुक्त्या या बैठकीत करण्यात आल्या. अंबाजोगाई तालुका अध्यक्ष शिवलिंग यादव, उपाध्यक्ष भागवत चन्ने,तालुका कार्याध्यक्ष श्रीकांत झिरमाळे,शहराध्यक्ष सुरज कापसे,युवा तालुका अध्यक्ष चंद्रशेखर तोडकर, तालुका उपाध्यक्ष संजय कापसे,


तालुका सरचिटणीस लक्ष्मण बाशिंगे,संघटक मयुर बाबजे,

जिल्हा उपाध्यक्ष आसेफखॉन आफसर खॉन पठाण जिल्हा संघटक शैलेश झिरमिरे, जिल्हा सरचिटणीस लिंगेश्वर तोडकर आदींच्या नियुक्त्या करण्यात आल्या.या बैठकीला प्रमुख मार्गदर्शन म्हणून मराठवाडा विभागाचे राष्ट्रीय ओबीसी महासंघ अध्यक्ष पै. दिपक जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.बैठकीची प्रस्तावना बीड जिल्हाअध्यक्ष श्री संजय तोडकर यांनी केली.उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन ओबीसी बांधवाना केले. ओबीसी महासंघाच्या विविध कार्याचा लेखाजोखा याप्रसंगी मांडण्यात आला. बीड जिल्हा नवनियुक्त कार्यकारणी ला शुभेच्छा देत सत्कार करण्यात आला.

## दोन चाकी वाहनावरील कर्णकर्कश हॉर्न धारकांवर कारवाई करा; नागरिकांची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील दोन चाकी वाहनांवर कर्णकर्कश हॉर्न वाजवून धडकी भरवणा-या वाहन धारकांवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी ज्येष्ठ नागरिक करत आहेत



या संदर्भात ते म्हणतात की अंबाजोगाई शहरातील अनेक दोन चाकी वाहन धारकांनी आपल्या गाड्यांवर कर्णकर्कश आवाजाचे हॉर्न बसवले आहेत. हे वाहन धारक शहरातील विविध भागातुन अति वेगाने वाहने चालवत असुन अति कर्णकर्कश आवाजाचे हॉर्न वाजवून ज्येष्ठ नागरिक व -हदय रोगांच्या रुग्णांमध्ये धडकी भरवत आहेत. अचानक मोठ्या आवाजातील हॉर्नचा आवाज ऐकू आल्यामुळे -हदयरोग रुग्णांचे आजार वाढत चालले आहेत.शहरातील कर्णकर्कश हॉर्न बसवलेल्या वाहनांचा शोध घेवून त्यांचे विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करत आहेत.

# ग्रामीण रुग्णालय, धानोरा(बु.) येथे एकाच दिवशी झाल्या ८ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

### महिन्याच्या २ ऱ्या व ४ थ्या शुक्रवारी होणार कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिनांक २७/१०/२०२४ वार रविवार रोजी ग्रामीण रूग्णालय धानोरा (बु.) या ठिकाणी डॉ. अशोक थोरात, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड यांनी स्वतः एकुण ०८ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया (दुर्बीण) द्वारे केल्या.

सदर शिबिर हे डॉ. विजय ढवळे (वैद्यकीय अधीक्षक) ग्रामीण रुग्णालय धानोरा(बु.) डॉ. रणजीत जाधव, डॉ. अभिजीत सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. सदर शिबीर यशस्वी होण्याकरिता डॉ. सपाटे (भुल तज्ञ), अधिपरिचारिका ज्योती अरखडे, सुवर्णा फुले, रेश्मा होके, शेख तबसुम, सविता बागल, श्री. निलेश देशमुख, औषध निर्माण अधिकारी श्री. विजय इर्लेकर, बालाजी गुरले कनिष्ठ सहायक



श्री. शरद भोसले, आरकेएसके समुपदेशक सलमान मनियार, डी. ई. ओ माजेद शेख, वाहनचालक श्री. हरी सोमवंशी, कक्ष सेवक श्री. लक्ष्मण कचरे, सुंदर देवकते, श्रीमती. सावध, सफाईगार श्री. नितीन सावळकर, किशोर सोनवणे यांनी अथक परिश्रम घेतले. सदर शिबीरामुळे परिसरातील लाभार्थींकडुन समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांनी आमिषाला बळी न पडता बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणावा-राठोड

**जालना । प्रतिनिधी**

शेतकर्यांनी कोणत्याही व्यापार्यांच्या बाहेरच्या आमिषाला बळी न पडता त्यांचा शेतमाल थेट कृउबासमध्ये विक्रीसाठी आणावा, असे आवाहन जालन कृउबास समितीचे सचिव मोहन राठोड यांनी केले आहे.

बाजार समितीमध्ये सोयाबीनची आवक वाढली असुन बाजार समितीचे कार्यक्षेत्रातील शेतकर्यांसाठी जालना कृषि उत्पन्न बाजार समिती कडून न्यू मार्केट यार्ड जालना येथे शेतमाल खरेदी विक्रीसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तरी बाजार समिती कार्यक्षेत्रातील शेतकर्यांनी आपला शेतमाल बाजार समितीचे आवारातच विक्री करावा. कारण अनेक विनापरवानाधारक अवैध व्यापारी शेतकर्यांचे घरी जावुन जागेवर खरेदी करत आहे. तसेच अनेक ठिकाणी अवैध शेतमाल खरेदीचे माध्यमातून बाजार आवाराबाहेर परस्पर शेतकर्यांच्या शेतमालास जास्त भाव देण्याचे प्रलोभन देऊन, वजनमापात एक ते दोन किलोचा काटा मारून कित्येक व्यापार्यांनी कित्येक शेतकर्यांची आर्थिक फसवणूक केलेली असून अनेक शेतकर्यांवर अन्याय झाल्याच्या घटना, पैसे बुडवण्याच्या घटना घडलेल्या असल्याची



वस्तुस्थिती आहे. शेतकर्यांनी बाजार समिती आवारात आपला माल विक्रीसाठी अडत्याचे पेढीवर आणताच संबंधीत आडत्याकडून त्वरीत आवक वहीत नोंद करुन नांव, गांव, शेतमालाचे वर्णन, प्रकार, व शेतमालाचे वजन याची नोंद करुन पोच पावती घ्यावी. शेतकर्यांनी आपल्या शेतमालाचे वजन इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावरच केले जाईल. याकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे. बाजार आवारातील अडत्याने इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर शेतमालाचे मोजमाप करण्यास टाळाटाळ केल्यास ताबडतोब बाजार समिती कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन जालना कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव मोहन राठोड यांनी केले आहे.

## राजकारणाने समाजाची

जनतेवर वॉच ठेवण्यात किंवा आपल्याशी कटीबद्ध करण्यात आजचे नेते अपयशी झाल्या सारखे वाटत आहे. पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्याला न भूतो न भविष्यती असा निधी उपलब्ध करून दिला म्हणून नवीन कार्यकर्त्याची रीघ लागली परंतु त्यांच्याशी प्रमाणीक असणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय देता आला नाही तरीही आज ते कार्यकर्ते प्रमाणीक आहेत. परंतु ऐनवेळी आलेल्या कार्यकर्त्यांनी मात्र डल्ला मारला आणि ते सोडूनही गेले आहेत. तरीही आज जिल्ह्यात पंकजाताई याच खऱ्या अर्थाने मास लीडर आहेत. खरं तर कार्यकर्ता हा नेत्याशी प्रमाणीक असला पाहिजे आणि नेता सुद्धा कार्यकर्त्यांसाठी कटीबद्ध असला पाहिजे असे सुत्र असले तर राजकारण टिकून राहते अन्यथा जास्त दिवस राजकारण टिकत नाही.

मनोज जरांगे पाटील फॅक्टरमुळे लोकसभा निवडणुकीत कट्टर जातीयवाद झाला होता परंतु जरांगे पाटलाचे आंदोलन गैर नाही ते समाजासाठी लढा देत आहेत. ओबीसी नेते छगनराव भुजबळ यांनी सुद्धा ओबीसी आरक्षण बचाव लढा सुरू केला तोही योग्यच आहे. कारण आपल्या ताटातील भाकरी हिसकावून घेतांना कोणीही शांत बसणार नाही. परंतु या सर्व घडामोडी मध्ये जातीपातीचे भांडण सुरू झाले.

आता तर परिस्थिती हाताबाहेर गेलेली आहे नवीन वारं वाहू लागले आहे. जो तो जातीच्या जोखडात अडकला आहे. लहान मुलं जातीपाती मध्ये अडकले आहेत. शाळेत गेले की तु ओबीसी मी मराठा हा मागासवर्गीय असा भेदाभेद सुरू झाला आहे. मुलं घरी आले की अनुत्तरीत प्रश्न विचारत आहेत. गल्लीतील बायका बायकांमध्ये जातीने घुसखोरी केली आहे. सांप्रदायामध्ये जात घुसली आहे. खेड्यापाड्यात जातीभेदामुळे राम राम बंद झाला आहे एकंदरीत प्रश्न गंभीर बनला आहे. लोकसभेचा पराभव ओबीसी च्या जीवावरी लागल्यामुळे ओबीसी मतदार हा नेत्याच्या हाताबाहेर गेला आहे. प्रत्येक ओबीसी मतदार हा पराभवाचा वचपा काढण्यासाठी सज्ज झाला आहे. एकंदरीत परिस्थिती हाताबाहेर गेली आहे आणि त्यात प्रत्येकजण उठसूठ आमदार म्हणून वावरत आहे. एखाद्या वेळेस जातीच्या मुद्यावर निवडून येता येईल परंतु प्रत्येकवेळी असा डाव साधणार नाही. जातीच्या आधारावर निवडलेला प्रतिनिधी काहीच करु शकत नाही हे आपण यापूर्वी पाहिलेलं आहे. म्हणून तर सुशिक्षित, होतकरू, प्रमाणीक असणाऱ्या उमेदवारास न्याय दिला पाहिजे. एकंदरितच आजच्या राजकारणामुळे समाजाची घडी विस्कटली आहे ती विस्कटलेली घडी आजच्या नेत्यांना पुर्ववत करता येईल का? हा प्रश्न सामान्य लोकांना पडला आहे आणि खरोखरच सुशिक्षित माणसांनी या प्रश्नावर गांभीर्याने विचार केला पाहिजे तरचं समाजव्यवस्था पुर्वपदावर येऊ शकते.

जगतगुरु तुकाराम महाराज यांनी चारशे वर्षांपूर्वी आपल्या अभंगातून समाजाला उपदेश केला आहे. विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ

## माजलगाव विधानसभा

होतो.परंतू असे न होता मला पक्षाने निवडणूक लढण्याची संधी व तिकीट दिले नाही.या मुळे मतदार संघातील जनता नाराज झालेली असून तुम्ही अपक्ष निवडणूक लढवावी आम्ही तुमच्या पाठीशी आहेत हा दबाव माझ्यावर वाढत असल्यामुळे मी माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४ जनतेच्या विश्वासावर अपक्ष लढवणार असून सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता माझा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.

## सुरेश धस यांचा ऊमेदवारी

आणनारे सुरेश अण्णा यांना विधानसभा नीवडनुकीत भरघोस मतांनी विजयी करून अजुन पाटोदा तालुक्यातील राहीलेली विकासाची कामे करायला आण्णाला नीवडुन देण्यासाठी ऊद्या सकाळी सर्व नागरिकांनी जास्तीस जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते सय्यद शहाबाज यांनी केले आहे

# दिवाळीच्या सणालाही निराधारांचे अनुदान नाही

**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा येथील व चौसाळा परिसरातील श्रावण बाळ अपंग परितकत्या या सह निराधार लाभारती नागरिकांना बीड ताहसिल च्या वतीने अनुदान मिळते सदर अनुदान हे गेल्या दोन ते तीन महिन्या पासून सम्मानधित लाभात्र्याला अध्यापही वाटप झाले नसल्याने निराधारासह लाभारत्याची कुचंबाना होत आहे सम्मनधित अधिकाऱ्याने त्वरित अनुदान वाटप करून नागरिकांची दिवाळी गोड करावी अशी मागणी नागरिक करतात

बीड तहसील च्या वतीने सम्मनदीत लाभारती नागरिकांना दिले जाणारे अनुदान दिवाळी आली तरी ही वाटप झालेले नाही त्यामुळे लाभारत्यातून नाराजीचा सुर निघत आहे सम्मनदीत आधीकार्याने २ दिवसात तातडीने अनुदान पाठवून निराधार नागरिकांची दिवाळी गोड करून त्यांना सुखा चे २ घास मिळावेत अशी मांगणी लाभारती व निराधार नागरिकांतून कातून केली जाते

# परतीच्या पावसाचा फटका : काढलेल्या सोयाबीनची यंत्राच्या साह्याने मळणी, शेतातले सोयाबीन मात्र पाण्याच्या डोहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पावसाने सोयाबीनची स्थिती गतवर्षीप्रमाणे यंदा ही तशीच झाल्याने तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या हाहाकाराने हिरावला आहे.पण ज्या शेतकऱ्याचे सोयाबीन उंचीवरील शेतावर होते त्यांनी काढणी करून ढिग केले आहेत. रब्बीच्या पेरणीसाठी सोयाबीन मळणीची लगबग यंत्राच्या साह्याने सुरु आहे. आणखी कांही शेतकऱ्याचे सोयाबीन मात्र पाण्यातच असल्याने काढणी रखडली आहे.

तालुक्यात परतीच्या पावसामुळे शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले आहेत. कांही शेतकऱ्याची खरीपाची पेरणी वेळेवर झाली होती. मात्र परतीच्या पावसाने हाहाकार केल्याने सोयाबीन डोहात पोहले. तर ज्या शेतकऱ्याची शेती उंचावरील भागात होती त्या शेतकऱ्याला मात्र पाण्याच्या डोहातून दिलासा मिळाला. मोठ्या पावसानंतरही दररोज ढगाळ वातावरण तर कधी रिमझिम पाऊस सुरूच होता. उंचावर शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनी काढणी करुन सुरक्षित ठिकाणी ढिग मारले आहेत.पावसाने भिजु नये



यासाठी ताडपत्री झाकली असल्याने ते शेतकरी पुन्हा झालेल्या पावसात फायद्यात राहिले आहेत. पण ज्यांची काढणी राहिली होती त्यांचे सोयाबीन मात्र पाण्याच्या डोहात आजही पोहत आहे. रब्बीच्या पेरणीसाठी दिपावलीच्या खर्चासाठी ज्या शेतकऱ्याचे ढिग पावसापासुन सुरक्षित होते त्या शेतकऱ्यांनी यंत्राच्या साह्याने मळणी सुरू केली आहे.

आणखी कांही शेतकऱ्याचे सोयाबीन चिखल पाण्यातच आजही पोहतच आहे. खरीप गेले रब्बीसाठी चिखलमय शेती झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त बनले आहेत. ढिग असलेले सोयाबीन चांगले वाटत असले तरी काळसर पडून उतार कमी येत आहे. बाजारातही दरवर्षीच्या तुलनेत भाव कमी आहेत. चिखल पाण्यातील सोयाबीन मातीमोल भावात जात आहे. बाजारात व्यापारी सोयाबीनची खरेदी मात्र कोंबड्याचे खाद्य म्हणून खरेदी करत आहेत. डोहातल्या सोयाबीनचे पदरात तर कांही पडणार नाही पण जनावरांच्या चाऱ्यासाठी सुद्धा भुसकट उपयोगात येणार नसुन भुसकट उकीरड्यात भरण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही परतीच्या पावसाने बहुतेक शेतकऱ्यांची सुगी हातची गेली असुन रब्बीच्या सुगीवरच शेतकऱ्याची मदार आहे.

# महात्मा फुले कृषी विद्यापीठाला 'ए' ग्रेड उत्कृष्ट मानांकन

परभणी : नवी दिल्लीच्या भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय कृषी शिक्षण अधिस्वीकृती मंडळाची बैठक झाली. या बैठकीत पाच वर्षांसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाला अधिस्वीकृती मिळाली असून विद्यापीठास 'ए' ग्रेड उत्कृष्ट मानांकन दिले आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठात कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू आहे. अनेक उपक्रम विद्यापीठाकडून राबवले जात आहेत. नवी दिल्लीच्या भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय कृषी शिक्षण अधिस्वीकृती मंडळाची बैठक झाली. त्यात विद्यापीठाचा गौरव झाला. विविध महाविद्यालयांतील बीएस्सी (कृषी), पदव्युत्तरच्या कृषी व संलग्न पदव्या, बी. टेक, एम. टेक व आचार्य या पदव्यांच्या विविध विषयांना व महाविद्यालयांना राष्ट्रीय कृषी शिक्षण अधिस्वीकृती मंडळाने अधिस्वीकृती दिली आहे. यामध्ये राहुरी येथील पदव्युत्तर महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, पुणे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषी महाविद्यालय, कोल्हापूर, कृषी महाविद्यालय, धुळे, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी




अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय व कृषी महाविद्यालय, नंदुरबार यांचा समावेश आहे. हे मानांकन देताना राष्ट्रीय कृषी शिक्षण अधिस्वीकृती मंडळाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीने जून महिन्यात विद्यापीठ व विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांना प्रत्यक्ष पाहणी केली, यावेळी त्यांनी महाविद्यालयांच्या शैक्षणिक सुविधांबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा केली. याप्रसंगी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी समितीसमोर सादरीकरण केले होते. समितीने विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांचे सर्वेक्षण करून मूल्यांकन केले. यामध्ये विद्यापीठस्तरीय तसेच महाविद्यालयांचे प्रशासन, विविध विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांची संख्या, शैक्षणिक उपक्रम, शिक्षणासाठी असलेल्या विविध सुविधा यामध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर, संशोधनासाठी उपलब्ध सुविधा, विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये झालेली निवड व त्यांनी सुरू केलेले उद्योग यांचा समावेश आहे.

अधिष्ठाता (कृषी) डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे, नियंत्रक सदाशिव पाटील, नोडल अधिकारी डॉ. एम. आर. पाटील आणि अधिस्वीकृती मिळालेल्या कृषी व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता यांनी या मानांकनासाठी योगदान दिल्याचे सांगितले जात आहे.




### महत्वाच्या घटना

१४२० : बीजिंगला अधिकृतपणे मिंग साम्राज्याची राजधानी म्हणून नियुक्त केले गेले.
१४९० : क्रिस्टोफर कोलंबस पहिल्या प्रवासानंतर क्युबा मध्ये पोहोचले.
१६३६ : अमेरिकेतील हारवर्ड विद्यापीठाची स्थापना
१८८६ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ग्रोव्हर क्लीव्हलँड यांनी स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा राष्ट्राला अर्पण केला.
१९०४ : पनामा आणि उरुग्वे यांच्यात राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९२२ : बेनिटो मुसोलिनीच्या नेतृत्त्वाखाली ईटलीतील फॅसिस्टांनी रोममधील सरकार उलथवले.
१९४० : दुसरे महायुद्ध  ईटलीने ग्रीसवर हल्ला केला.
१९६९ : तारापूर अणूवीज निर्मिती केंद्र सुरू झाले

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६७ : मार्गारेट नोबल ऊर्फ 'भगिनी निवेदिता' स्वामी विवेकानंदांच्या शिष्या, भारतीय संस्कृतीच्या आणि स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्या मूळच्या आयरिश होत्या. २५ मार्च १८९८ रोजी स्वामी विवेकानंदांनी त्यांना विधिवत ब्रम्हचारिणी व्रताची दीक्षा दिली व त्यांचे नाव 'निवेदिता' ठेवले. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १९११)
१८९३ : शंकर केशव कानेटकर ऊर्फ 'कवी गिरीश' (मृत्यू: ४ डिसेंबर १९७३)
१९३० : लालजी पाण्डेय तथा 'अंजान' हिन्दी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार (मृत्यू: १३ सप्टेंबर १९९७)
१९५५ : इन्द्रा नूयी  भारतीय वंशाच्या अमेरिकन कॉर्पोरेट अधिकारी
१९५५ : बिल गेटस  मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक
१९५६ : मोहम्मद अहमदिनेजाद  ईराणचे ६ वे राष्ट्राध्यक्ष
१९५८ : अशोक चव्हाण  महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्री, उद्योगमंत्री आणि खाणकाममंत्री
१९६७ : ज्यूलिया रॉबर्टस  अमेरिकन अभिनेत्री
१९७९ : युट्यूब चे सहसंस्थापक जावेद करीम यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६२७ : जहांगीर  ४ था मुघल सम्राट (जन्म: ३० ऑगस्ट १५६९)
१८११ : हिज हायनेस राजराजेश्वर सवाई श्रीमंत यशवंतराव होळकर बहादूर (जन्म: ३ डिसेंबर १७७६)
१९०० : मॅक्समुल्लर  जर्मन विचारवंत (जन्म: ६ डिसेंबर १८२३)
१९४४ : हेलन व्हाईट  डॉक्टरेट मिळवणारी पहिली अमेरिकन महिला (जन्म: २८ नोव्हेंबर १८५३)
२००२ : एच अँड एम चे संस्थापक इर्लिंग पर्स्सन यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १९१७)
२०१० : ग्रीनलँड देशाचे पहिले पंतप्रधान जोनाथन मोट्झफेल्ड यांचे निधन. (जन्म: २५ सप्टेंबर १९३८)
२०१३ : भारतीय लेखक राजेंद्र यादव यांचे निधन. (जन्म: २८ ऑगस्ट १९२९)

## लिंबु फळगळीचे नियंत्रण



लिंबूवर्गीय फळझाडांची फळधारणेनंतर होणारी फळगळ जरी नैसर्गिक व झाडाच्या सर्वसाधारण आरोग्यासाठी हितकारक असली तरी विपरित वातावरणाच्या तडाख्याने पूर्ण फळगळ होऊ नये, यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे.

फळगळ टाळण्यासाठी उपाय : ॲसेटिक ॲसिड (२, ४-डी), नॅफथंलीन ॲसेटीक ॲसिड (एन.ए.ए.), २, ४, ५-ट्रायक्लोरोफिनॉक्सि अंसेटिक ॲसिड (२, ४, ५-टी), जिबरेलिक ॲसिड (जी.ए.-३) वगेरे तत्सम रासायनिक संयुगे वनस्पतीतील अंतर्गत ऑक्सिजन वाढवून पेशीक्षय मंद करण्याचे कार्य करतात. अशी कितीतरी संयुगे लिंबूवर्गीय फळगळीच्या नियंत्रणासाठी वापरली गेली आहेत. याकरिता आंबिया बहाराची फळधारणा झाल्यानंतर मे आणि जून महिन्यात एन.ए.ए. हे संजीवक १० पी.पी.एम. (१ ग्रॅम प्रती १ लीटर पाणी) + १.५ टक्के युरिया (१.५ किलो प्रती १ लीटर पाणी) या प्रमाणात घेऊन फळे वाटाण्याएवढी असताना फवारणी करावी किंवा २, ४-डी १५ पी.पी.एम. किंवा जिबरेलिक आम्ल १५ पी.पी.एम्? + बेनोमिल किंवा बाविस्टिन १००० पी.पी.एम + युरिया १ टका या मिश्रणाची प्रत्येकी एक फवारणी करावी. याच मिश्रणाच्या दोन फवारण्या पुन्हा एक महिन्याच्या अंतराने सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात तोडणीपूर्वी फळगळ रोखण्यासाठी कराव्यात. त्याचप्रमाणे बुरशीजन्य रोगांमुळे होणारी गळ जास्त प्रमाणात निदर्शनास आल्यास बेनलेट किंवा बाविस्टिन या बुरशीनाशकांच्या एक ग्रॅम एक लीटर पाण्यात मिसळून तीन फवारण्या १५ दिवसांच्या अंतराने तोडणीच्या साधारण दोन महिने आधीपासून कराव्यात. कीटकांमुळे होणाऱ्या फळगळीत फुले येताना व फळधारणा होताना सिट्रस सिल्ला या किडीच्या नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस १.२५ मि.ली. किंवा ॲसिफेट १.२५ ग्रॅम किंवा इमिडॅक्लोप्रिड ०.५ मि.ली. एक लीटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.

## कापूस पिकावर बोंडसड रोगाचा प्रादुर्भाव आणि उपाय !

सततचा आणि जास्त पाऊस, ढगाळ वातावरण आणि हवेतील अति आर्द्रता यामुळे कापूस पिकात हिरव्या बोंडातील आतील भाग सडण्याची समस्या प्रामुख्याने बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत आढळत आहे, यालाच बोंडसड असे म्हणतात. अशी बोंडे बाहेरून निरोगी दिसत असली तरी अशी हिरवी बोंडे फोडून बघितल्यावर आतील रुई व बिया प्रामुख्याने पिवळसर गुलाबी ते लाल रंगाच्या होऊन सडल्याचे आढळते. साधारणतः बोंडातील एक ते दोन कप्पे, तर काही ठिकाणी संपूर्ण बोंड सडल्याचे आढळले. अनेक ठिकाणी बोंडसडचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्यावर आढळून येतो. त्यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. जाणून घेऊ या या रोगाची कारणे आणि उपाय.

बोंडसड रोगाची कारणे : जास्त पाऊस, सतत ढगाळ वातावरण आणि हवेतील अति आर्द्रता बोंडसड साठी पोषक वातावरण आहे. रोगकारक बुरशी, जीवाणू, रस शोषक ढेकूण व किडी यांच्याद्वारे या रोगाचा प्रसार होतो.

बोंडसड प्रकार – बाह्य बोंडसड – बोंडाच्या पृष्ठभागावर होणारा संसर्ग: या प्रकारात मुख्यत: काही रोगकारक बुरशी, कुजलेल्या अवशेषांवर जगणारे सूक्ष्मजीव तसेच काही प्रमाणात



बोंडावरील जीवाणू कारणीभूत असतो.

आंतरिक बोंडसड – कमी प्राणवायु अवस्थेत तग धरणारे जीवाणू, रोगकारक जीवाणू आणि काही प्रमाणात रोगकारक बुरशीच्या संसर्गामुळे आंतरिक बोंडसड होते. अशी बोंडे बाहेरून निरोगी दिसतात. मात्र आतील रुई पिवळसर-गुलाबी ते लाल-तपकिरी रंगाची होऊन सडते. विकसित अवस्थेतील बियासुद्धा सडल्याचे आढळतात.

बोंडसड रोगाचे एकात्मिक नियंत्रण : सिंचन आणि नत्रयुक्त खताचा अतिरिक्त वापर टाळावा. चांगल्या व्यवस्थापन पद्धतींद्वारा कापूस पिकाची अतिवाढ रोखावी. लाल रंगाच्या ढेकणापासून पिकाचे संरक्षण करावे.बोंडाच्या पृष्ठभागावर होणारा बुरशीचा संसर्ग रोखण्यासाठी खालील प्रमाणे फवारणी करावी. कार्बेन्डाझिम (१२ टक्के) + मॅन्कोझेब (६३ टक्के डब्ल्यू.पी.) (संयुक्त बुरशीनाशक) ०.३ ग्रॅम प्रति लिटर पाणी फवारणी करावी. किंवा कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्ल्यू.पी.) ०.४ ग्रॅम किंवा मेटीराम (५५ टक्के) + पायराक्लोस्ट्रोबिन (५ टक्के डब्ल्यू.जी.) २ ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल (२५ टक्के ई.सी.) १ मि.लि. किंवा ॲझोक्सीस्ट्रॉबीन (१८.२ टक्के डब्ल्यू/डब्ल्यू) + डायफेनोकोनॅझोल (११.४ टक्के डब्ल्यू/डब्ल्यू एस.सी.) (संयुक्त बुरशीनाशक) १ मि.लि. किंवा प्रोपीनेब (७० टक्के डब्ल्यू.पी.) २.५ ते ३ ग्रॅम आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने बुरशीनाशक बदलून दुसरी फवारणी करावी.

## मृग बहार डाळिंबाची फळवाढ आणि व्यवस्थापन



मृग बहार डाळिंब पिकात फळवाढ आणि पक्वता याचे व्यवस्थापन होणे गरजेचे आहे.

बागेची मशागत : फळबागेतून पाण्याचा संपूर्ण निचरा करावा. पावसामुळे झाडांच्या मुळांच्या जवळ पाणी साचलेले नाही, याची काळजी घ्यावी. पाणी साचून राहिल्यामुळे मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. फळांनी भरलेल्या फांद्यांना आधार देण्यासाठी योग्य प्रकारे स्टेकिंग किंवा काठीचा आधार करावा. फळांची योग्य वाढ होण्यासाठी व चांगले वजन मिळवण्यासाठी गुच्छामधील जास्त आणि गरजेपेक्षा अधिक फळे काढावीत. पाच वर्षाच्या झाडासाठी प्रति झाड सुमारे ८० ते १०० फळे घ्यावीत. जास्त आर्द्रतेमुळे फळे गळण्याची समस्या उद्भवू शकते. तसेच फळांची परिपक्वता होण्यासाठी आणि चांगला रंग येण्यास थोडा विलंब होऊ शकतो म्हणून पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे. लवकर मृग बहार घेतलेल्या बागेमध्ये फळ पूर्ण पक्व होऊन सालीचा व दाण्यांचा रंग विकसित झाला असल्यास, फळगळ आणि बुरशीचे डाग टाळण्यासाठी वेळेत फळ तोडणी करावी.


अन्नद्रव्य व्यवस्थापन : ०-५२-३४ (मोनो पोटॅशियम फॉस्फेट) ६ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून १५-२० दिवसांचा अंतराने तीन फवारण्या कराव्यात. ६ ग्रॅम मँगनीज सल्फेट प्रति लिटर पाण्यात मिसळून १०-१५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. ०-५२-३४ (मोनो पोटॅशियम फॉस्फेट) ५.१२ किलो, यूरिया १२.५६ किलो आणि ०-०-५० (पोटॅशियम सल्फेट) ४.६ किलो प्रति एकर याप्रमाणे आठवड्याच्या अंतराने दहा वेळा ड्रीपद्वारे द्यावे.

## परतीच्या पावसामुळे शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव; तज्ज्ञांनी सुचविले एकात्मिक उपाय

या वर्षी मराठवाड्यात बऱ्याच भागात परतीचा पाऊस पडल्यानंतर सुप्तावस्थेतील शंखी गोगलगायी बाहेर पडताना आढळून येत आहेत, त्यामुळे फळबाग, कापूस यासारख्या पिकामध्ये गोगलगायींचा प्रादुर्भाव वाढून मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी या गोगलगायींचे वेळीच सामुहिकरीत्या एकात्मिक नियंत्रण करावे, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिलेला आहे.

शंखी गोगलगायीसाठी नियंत्रणात्मक उपाययोजना :

१) सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्या किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आत मध्येच मरून जातील. २) गोगलगायी जमा करताना अथवा हाताळणी करताना उघड्या हाताने न करता हातमोजे व तोंडावर मास्क घालूनच करणे गरजेचे आहे. शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर विविध ठिकाणी वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकांच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिकठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी. ३) गोगलगायींना आकर्षित करण्यासाठी शेतात ठिकठिकाणी गोणपाट ओले करून त्यावर पत्ताकोबी अथवा पपईची पाने बारीक करून ठेवावीत, त्याला आकर्षित होऊन जमा झालेल्या गोगलगायींवर तंबाखूचा अर्क ५ लिटर (२५० ग्रॅम तंबाखू भुकटी ७.५ लिटर पाण्यात उकळून ५ लिटर तयार झालेले



द्रावण) + कॉपर सल्फेट म्हणजेच मोरचूद द्रावण ५ लिटर (३०० ग्रॅम कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात) असे एकूण १० लिटर द्रावण फवारावे, त्याच्या संपर्कात आल्याने गोगलगायी मरतात. ४) लहान शंखीच्या नियंत्रणासाठी १० टक्के मिठाची (१०० ग्रॅम प्रति १ लिटर पाणी) फवारणी फायदेशीर दिसून आली आहे. बोर्डो मिश्रण (१ किलो मोरचूद + १ किलो चुना १०० लिटर पाण्यात), कॉपर सल्फेट (३०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड (२५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) इत्यादीच्या फवारण्या गोगलगाय नियंत्रणासाठी नोंदणीकृत नाहीत, परंतु गोगलगाय नियंत्रणासाठी किंवा त्यांना परावृत्त करण्यासाठी फळबागेत काही प्रमाणात परिणामकारक आहेत. ५) गोगलगायीच्या नियंत्रणासाठी मेटाल्डिहाईड दाणेदार या गोगलगाय नाशकाचा वापर करावा. ६) कापसासारख्या पिकामध्ये दाणेदार मेटाल्डिहाईड २ किलो प्रति एकर या प्रमाणात शेतात पसरून द्यावे. ७) फळबागेमध्ये झाडाखाली दाणेदार मेटाल्डिहाईड प्रति झाड १०० ग्रॅम पसरून टाकावे. शंखी गोगलगाय प्रामुख्याने पपईची रोपे व झेंडूच्या रोपांकडे आकर्षित होतात. म्हणून मेटाल्डिहाईडच्या गोळ्या पपईच्या पिवळ्या पानांजवळ ठेवतात. त्यामुळे त्या लवकर आकर्षित होऊन मोठ्या प्रमाणात मरतात. मेटाल्डिहाईडचा वापर जास्त तापमान व कमी आर्द्रता असते अशावेळी जास्त प्रभावी दिसून येतो. मेटाल्डिहाईडला पर्याय म्हणून आयर्न फॉस्फेटचा वापर २ किलो प्रति एकर या प्रमाणात अमिष म्हणून करता येतो. आयर्न फॉस्फेटचा वापर आर्द्रता जास्त असते अशावेळीही प्रभावी दिसून येतो. आयर्न फॉस्फेटच्या संपर्कात आल्यास गोगलगायी उपाशी राहून मरतात.

८) आयर्न फॉस्फेटचा वापर स्पिनोसॅड या कीटकनाशकासोबत (४ मिलि स्पिनोसॅड प्रति २ किलो आयर्न फॉस्फेट) केल्यास जास्त परिणामकारक होतो. आयर्न फॉस्फेट पाळीव प्राणी व इतर प्राण्यांना सुरक्षित आहे. वर सांगितल्याप्रमाणे आमिष उपलब्ध न झाल्यास, पुढील प्रकारे आमिष तयार करून बागेमध्ये टाकून घ्यावे. या व्यतिरिक्त अंड्यांच्या टरफलाचा चुरा, कोरडी राख,तांब्याची पट्टी अथवा जाळी, बोरिक पावडर, यीस्ट पावडरचे द्रावण, साखरेचे द्रावण इ. चा वापर गोगलगायी व्यवस्थापनासाठी करता येतो. आमिष तयार करण्याची पद्धती : दहा लिटर पाण्यामध्ये दोन किलो गूळ अधिक २५ ग्रॅम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे. हे द्रावण ५० किलो गव्हाच्या अथवा भाताच्या कोंड्यात टाकून चांगले मिसळावे. १० ते १२ तास हे मिश्रण आंबविण्यासाठी ठेवावे. त्यानंतर त्यामध्ये थायामिथोक्झाम २५ टक्के ५० ग्रॅम चांगल्या प्रकारे मिसळावे. हे आमिष शेतामध्ये ढीगाच्या स्वरुपात किंवा बांधाच्या कडेने पट्टा स्वरुपात टाकावे. सदरील आमिष पासून पाळीव प्राणी, लहान मुलांना दूर ठेवावे आणि वरील गोगलगाय नाशक अथवा अमिषाचा वापर प्लॅस्टिक हातमोजे घालूनच काळजीपूर्वक करावा.अशाप्रकारे शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव ज्या भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत असेल त्या भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या वरील प्रमाणे उपाय योजना सुरवातीपासूनच केल्यास गोगलगायीचे नियंत्रण अधिक प्रभावीपणे होते.

# मेहबूब शेख यांना निवडून आणण्यासाठी संपूर्ण ताकदीने प्रयत्न करणार

## आपल्यासाठी पक्षाचा आदेश महत्वाचा - ॲड. नरसिंह जाधव

पाटोदा। प्रतिनिधी

जातपात धर्म याचा विचार न करता आष्टी पाटोदा शिरूर तालुक्याच्या विकासासाठी आमचे नेते शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अधिकृत आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातील उमेदवार शेख मेहबूब यांना ताकद देऊन निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून आपल्यासाठी आमचे नेते शरद पवारसाहेब आणि पक्षादेश अंतिम असल्याचे ॲड. नरसिंह जाधव यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे विधी सेलचे राज्य उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रमुख ॲड. नरसिंह जाधव हे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. मात्र पक्षाने युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांना उमेदवारी जाहीर केली असल्याने त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करून पक्षाचे उमेदवार महेबुब शेख यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून आपल्यासाठी पक्षादेश महत्वाचा असल्याचे पत्रकार परिषदेत जाहीर केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव, जिल्हा कार्यकारणीचे सदस्य ॲड. सय्यद वहाब यांच्या उपस्थित होते.यावेळी पत्रकार परिषदेमध्ये शरदचंद्रजी पवार राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार पक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारचंद्र पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांचे अभिनंदन केले. व पक्षाच्या बाहेरून आयात उमेदवाराला उमेदवारी न देता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एकनिष्ठ कार्यकर्ते यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी सर्व इच्छूक उमेदवारांनी पक्षाकडे केली होती. ती मागणी मान्य करून नवीन चेहरा व एक अल्पसंख्यांक समाजातील परंतु सर्व समाजाला बरोबर घेऊन नेतृत्व करणारा चेहरा उमेदवार दिला त्याबद्दल पार्टीचे आभार मानले. तसेच आष्टी मतदार संघामध्ये भय, भ्रष्टाचार, गुंडगिरी व विकास हा महत्त्वाचा मुद्दा असून जात धर्म हा मुद्दा महत्त्वाचा नाही.आजपर्यंत ज्या ज्या लोकांना आष्टी विधानसभेमध्ये आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली त्यांना तीन-तीन टन संधी देऊनही पाटोदा तालुका विकासाच्या बाबतीत मागासलेला आहे. आष्टी मतदारसंघांमध्ये युवकांना रोजगार आष्टी मतदार संघामध्ये उद्योगधंदे मोठे उद्योग, पाटोदा, कडा, आष्टी, शिरूर या मोठ्या शहरांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी या मूलभूत गोष्टी देखील देता आलेल्या नाहीत. अनेक खेड्यामध्ये रस्ते नाहीत. पाटोदा शहरांमध्ये देखील रस्त्यांची दुरवस्था आहे. मंजूर झालेले महामार्ग देखील पूर्ण नसल्यामुळे नागरिकांना उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करावा लागतात. नगरपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद प्रशासनामध्ये लोकांच्या आडवणूक व भ्रष्टाचाराचे पेव सुटलेले आहे. यावर निवडून आलेल्या आमदारांची लक्ष असून, फक्त ठराविक लोकांना गुत्तेदारांना पोसण्याचे काम या पद्धतीने केलेले आहे. त्यामुळे जातपात धर्म याचा विचार न करता मेहबूब शेख यांना निवडून आणण्यासाठी संपूर्ण ताकदीने पाटोदा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करणार असल्याचे ॲड. जाधव यांनी सांगितले आहे.

# मनोज जरांगे पाटील यांची महिला भगिनींनी घेतली भेट

## बीड मधून राजेंद्र मस्के यांना उमेदवारी द्या



बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदार संघ निवडणुकीत मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांना उमेदवारी देण्यात यावी. यासाठी बीड शहरातील घरेलू महिला कामगार संघटनेच्या शिष्टमंडळाने अंतरवली येथे भेट घेऊन, उमेदवारीची मागणी केली आहे.

बीड मधून राजेंद्र मस्के यांनी निवडणूक लढवण्यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी केली असून, त्यांना निवडणूक लढवण्याची संधी पाटलांनी द्यावी. अशी मनोमन इच्छा बीड मतदार संघातील सामान्य जनतेतून उमटू लागली आहे. राजेंद्र मस्के नेहमी जनसेवेच्या बळावर राजकारण करतात. सर्व जाती, धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन काम करण्याची सवय यामुळे जनसंपर्क दांडगा आहे. बीड शहरातील हजारो घरेलू महिला कामगारांसाठी पुढाकार घेऊन, त्यांच्या न्याय हक्कासाठी झटतात. शासनाच्या विविध योजना मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना लाभासाठी मोफत सुविधा केंद्र उभारून मदत केली. शेतकरी व गोरगरीबांच्या कल्याणसाठी त्यांचा पुढाकार नेहमी असतो. जनतेच्या कामी पडणाऱ्या माणसाला आमदार करणे आवश्यक आहे. संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी राजेंद्र मस्के यांना उमेदवारी देऊन गोरगरीबांची सेवा करण्याची संधी द्यावी अशी विनंती महिला भगिनींनी मनोज जरांगे पाटील यांच्याकडे भेट घेऊन केली आहे. आज सोमवार रोजी शेतकरी मित्र राजेंद्र मस्के सकाळी ११.३० वा. अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूल मध्ये आजी-आजोबा दिवस

माजलगाव। प्रतिनिधी



आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलतर्फे 'ग्रँड पेरेंट्स डे' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सध्याच्या परिस्थितीत आई-वडील नोकरी किंवा व्यवसायासाठी घराबाहेर असतात, त्यामुळे मुलांच्या संगोपनात आजी-आजोबांचा मोलाचा सहभाग असतो. शाळेबाहेर मुलं आजी-आजोबांसोबत अधिक वेळ घालवतात, त्यामुळे त्यांचे अनुभव आणि संस्कार मुलांच्या जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. या पार्श्वभूमीवर आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलने 'आजी-आजोबा दिवस' या अनोख्या सोहळ्याचे आयोजन केले.या सोहळ्याची सुरुवात ढोल-ताशांच्या गजरात आजी-आजोबांचे जल्लोषात स्वागत करून झाली. रॅम्प वॉकच्या माध्यमातून नातवांसह आजी-आजोबांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. सिनियर केजी वर्गातील विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांसाठी विशेष स्वागत गीत सादर केले, तर नर्सरी व ज्युनिअर केजीच्या मुलांनी विविध नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

कार्यक्रमादरम्यान, जुन्या काळातील विटी-दांडू, काच-कांड्या, गोट्या, चक्का यांसारखे पारंपरिक खेळ आजी-आजोबांसाठी आयोजित करण्यात आले. तसेच, त्यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्यांच्या काळातील चित्रे रेखाटून सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला होता. हे सर्व पाहून आजी-आजोबा आपल्या बालपणात रंगून गेले.कार्यक्रमात आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांविषयी एक अद्भुत नाटक सादर केले, ज्यामुळे उपस्थित सर्वजण भावूक झाले. या वेळी शाळेच्या संस्थापिका भाग्यश्री करवा मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि सांगितले की, ''आजी आजोबा आणि नातवंडांचे नाते हे विलक्षण असते.'' संचालक सागर करवा सर यांनी या नात्यातून खऱ्या अर्थाने जडणघडण होत असल्याचे सांगितले. त्यानंतर, शाळेच्या व्हाइस प्रिन्सिपल बिंदू मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पुनम ललवाणी मॅडम व अंकिता लाटे मॅडम यांनी केले. या सोहळ्याचे यश संपूर्ण शिक्षक वृंदाच्या अथक परिश्रमांमुळे साध्य झाले.

# संपूर्ण ताकदीने कामला लागलेल्या जयसिंह सोळंके यांचा भ्रमनिरास

## प्रकाश सोळंके यांच्या उमेदवारीने माजलगव मतदारसंघात कही खुशी कही गम

अजित पवार गटाकडून प्रकाश सोळंके यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली पण मतदारसंघात कुठेही कार्यकर्त्या नी आनंद उत्सव साजरा केल्याचे दिसले नाही त्यामुळे कार्यकर्ते नाराज आहेत की काय अशा चर्चा सामन्य मतदार करत आहेत.पक्षाने ऐनवेळी उमेदवारी नाकरल्याने जयसिंह सोळंके हे कोणता निर्णय घेतात त्यांच्या भूमिकेकडे मतदार संघाचे लक्ष लागले आहे

धारूर। प्रतिनिधी

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या माजलगाव मतदार संघातून अजित पवार गटाकडून जयसिंह सोळंके यांना अधिकृत उमेदवारी मिळणार असल्याचे जवळपास निश्चित झाले होते परंतु ऐनवेळी विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या नावाची घोषणा सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत केली ही बातमी समजताच जयसिंह सोळंके यांच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली तर प्रकाश सोळंके यांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसला.

माजलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी २०१९ ची निवडणुकीत ही माझी शेवटची निवडणूक म्हणून मतदारांना भावनिक करून लढवली व विजय मिळवला २०२४ च्या निवडणुकीपूर्वी राजकीय निवृती जाहीर करून पुतण्या जयसिंह सोळंके आपला राजकीय वारसदार म्हणून घोषित केला. माजलगाव मतदार सघातील तरुण कार्यकर्त्यांची मोठी फळी जयसिंह सोळंके नी कामाला लावली होती तर दोघे काका पुतणे मतदार संघात संयुक्त बैठक आयोजित करून प्रचार सुरू केला होता माजलगाव येथे जन सन्मान यात्रे चे नियोजनही जयसिंह सोळंके यांनी केले माजलगाव मतदार संघात विविध कार्यक्रमाच्या माध्माद्वारे मतदारांपर्यंत पोहचले,पण ऐन वेळी समोरचा महविकस आघडीचा उमेदवार ठरण्याआधीच त्या उमेदवारा समोर टिकाव लागणार नाही म्हणून अचानक अजित पवार गटाकडून प्रकाश सोळंके याच्या नावाची अधिकृत घोषणा झाली संपूर्ण ताकदीने कामाला लागलेल्या जय सिंह सोळंके यांना पक्षाने उमेदवारी नाकारल्याने त्याच्या कार्यकर्त्या ना धक्का बसला तर प्रकाश सोळंके यांचे कार्यकर्ते सुखवल्याचे काहीसे चित्र मतदार संघात निर्माण झाले आहे.



म्हसोबावाडी :आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध समाजसेवक तथा पत्रकार समीर शेख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, माजी सरपंच विठ्ठल राख, तेज वार्ताचे सहसंपादक निसार शेख, शिक्षक बंडू राऊत, किरण शिनगारे,संदिप जगदाळे, चंद्रकांत सपकाळ,पत्रकार संतोष नागरगोजे, अक्षय विधाते, सचिन पवार, आदी दिसत आहेत

# दैवशाला शिंदे यांचे निधन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मौजे होळ येथील रहिवासी दैवशाला वसुदेव शिंदे (वय ५५ वर्ष) यांचे दिर्घ आजाराने शनिवार दि. २६ आक्टोंबर रोजी निधन झाले.



दैवशाला शिंदे ह्या स्वभावाने मनमिळावू तसेच दुसर्याच्या सुख दुःखात सहभागी होणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या, धार्मिक सामाजिक,सांस्कृतिक सोहळ्यात त्या नेहमी अग्रेसर असत.आपल्या संस्कारातून मुलांना योग्य मार्गदर्शन देवून उत्तम पद्धतीने मुलाची जडण-घडण व्हावी या उद्देशाने त्यांनी कार्य केले.त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पार्थिवावर दुपारी त्यांच्या राहत्या गावी मौजे होळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध स्तरातील नागरिक, ग्रामस्थ,पत्रकार उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुली, असा परिवार आहे. जेष्ठ पत्रकार वसुदेव शिंदे यांच्या त्या पत्नी होत्या.

# नवीदोद्दिन सिद्दिकी यांना एआयएमआयएम (इन्कलाब) ची उमेदवारी जाहीर

माजलगाव। प्रतिनिधी

शहरातील धडाडीचे तरुण तडफदार सामाजिक कार्यकर्ते नवीदोद्दीन सिद्दिकी यांना एआयएमआयएम (इन्कलाब) पक्षाने माजलगाव विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी दिली असून त्यांच्या उमेदवारीमुळे तरुण आणि ज्येष्ठ मतदारांतून आनंद व्यक्त केला जात आहे.

माजलगाव विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. खवी अब्बासी व बीड जिल्हाध्यक्ष शेख मुस्तफा यांच्या संपर्कात माजलगाव चे मुस्लिम संघर्ष विकास मोर्चा व बांधकाम कामगार मजूर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांची धडपड, चळवळ व गोरगरिबांसाठी तत्पर असणारे, २४ तास जनसेवेचे काम करणारे सर्व समाजाला, सर्वधर्माचे लोक व जनतेला सोबत घेऊन चालणारे व सर्वांचे प्रश्न सोडविणारे इमानदार व संघर्ष योद्धा तसेच गोरगरीब, वंचित लोकांसाठी वेगवेगळे पद्धतीचे उपोषण, आंदोलन मोर्चे करणारे माजलगावात बीड जिल्ह्यात व महाराष्ट्रात चर्चित असलेले ऑल इंडिया मजलीस ए इत्तेहादुल् ? मुस्लिमीन (ओवैसी) पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते नवीदोद्दिन सिद्दिकी यांच्या कामाची दखल घेऊन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खवी अब्बासी व बीड जिल्हाध्यक्ष शेख मुस्तफा यांनी माजलगाव विधानसभा मतदार संघासाठी ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेख मुस्तफा यांनी राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. खवी अब्बासी यांच्याशी संपर्क भेट घेतली असता त्यांना माजलगाव विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढण्यासाठी बी फॉर्म देऊन नवीदोद्दीन सिद्दीकी यांची उमेदवारी पक्की केली आहे. यामुळे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात आनंद व्यक्त केला जात आहे.

# शेणापासून प्रतिकात्मक गवळणी तयार करण्याची प्रथा होतेय कालबाह्य

## दिवाळीत घडते असे ग्राम संस्कृतीचे दर्शन

पिंपळवंडी। प्रतिनिधी

आज दि.२८ ऑक्टोबर २०२४ सोमवारपासून ''वसुबारस'' ने दिवाळी सणास प्रारंभ होता आहे.धनत्रयोदशी,नरक चतुर्दशी,लक्ष्मीपूजन,बलिप्रतिपदा,भाऊबीज असा यावर्षी दि.२८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान दिव्यांची रोषणाई व आनंदोत्सवाचा दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.त्यातील आजचा दिवस म्हणजे वासरासह असलेल्या गाईचे सूर्यास्तानंतर पूजन करतात.या दिवशी दूध,दुधाचे पदार्थ, तळलेले पदार्थ खात नाहीत.गाय वासराच्या मूर्तीची पूजा करता येते.प्रत्येकासाठी आनंदाची मेजवानी घेऊन येणाऱ्या दिवाळी सणानिमित्त काही वैशिष्ट्यपूर्ण प्रथा, परंपराही आहेत.अंगणामध्ये शेणापासून प्रतीकात्मक गवळणी तयार करण्याची प्रथा कित्येक वर्षापासून सुरू आहे.दिवाळीतील पाच दिवस कुटुंबातील महिलांकडून अंगणात शेणाच्या गवळणींचा संसार थाटला जातो.त्यातून ग्राम संस्कृती,गावातील कृषी संस्कृतीचे दर्शन घडविले जाते.आता या प्रथेला आधुनिकतेचे ग्रहण लागले आहे. जनावरांची घटती संख्या हे त्यामागचे मुख्य कारण आहे.दिवाळीत अंगणात लावलेल्या पणत्या,दिवा,आकाश कंदीलाच्या प्रकाशात पूर्ण परिसर उजळून निघतो.या झळाळून निघणाऱ्या वातावरणात काही ठिकाणी महिला अंगणात शेणापासून गवळणीची प्रतिकृती बनवतात.वसुबारसे पासून पाडव्यापर्यंत महिला अंगण सारून एका कोपऱ्यात गळवणी बनवतात.त्यात मध्यभागी कामाने दमून आलेला बळीराजा दाखवला जातो.शेणाचीच चूल बनवून त्यावर दोन गवळणी स्वयंपाक करताना,काही गवळणी पाणी भरताना,जात्यावर दळताना एक गवळण लहान बाळ कडेवर घेऊन डोक्यावर टोपली घेत शेताला जाताना,काही गवळणी ताक करताना दाखविले जाते. गावची वेस दाखवून तेथे तुतारी वाजवणारा शिंगाडा ही दाखवला जातो.पाणी पिताना प्रतिकात्मक जनावरेही दाखवली जातात.या देखाव्यातून गावगाड्याचे दर्शन घडविले जाते.देखाव्याला फुला-पानांनी सजवून महिला त्याची पूजा करतात.आता जनावरांची संख्या कमी होत असल्याने शेण उपलब्ध होत नाही.त्याशिवाय नवीन पिढी या प्रथेत सहभागी होताना दिसत नाही. घरात जेष्ठ मंडळी असल्यासच अंगणात गवळणी पाहायला मिळत असल्याचे चित्र आहे.एकंदरीत दिवाळीत ग्राम संस्कृतीचा दर्शन घडवणारी ही प्रथा इतिहास जमा होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



# परळी मतदारसंघात महाविकास आघाडीत बंडखोरी अटळ

## राजेभाऊ फड यांनी अपक्ष लढावे; कार्यकर्त्यांचा आग्रह

परळी। प्रतिनिधी

२३३ परळी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने युवक नेते राजेभाऊ फड यांनी उमेदवारीची मागणी केली होती. मात्र ऐनवेळी पक्षाने वेगळाच उमेदवार दिल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठी नाराजी आणि संताप व्यक्त केला जात असून, लोकभावना आपल्या बाजूने असताना सुद्धा पक्षाने डावलले असल्याने राजेभाऊ फड यांनी स्वतंत्र निवडणूक लढवावी असा आग्रह धरला आहे. ही बाब लक्षात घेता सोमवार, दि.२८ ऑक्टोबर रोजी ते प्रचंड शक्तिप्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे.

महाविकास आघाडीकडून परळी मतदारसंघाच्या उमेदवारीबाबत सस्पेन्स कायम ठेवण्यात आला होता. अखेर रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून तिसरी यादी जाहीर करण्यात आली. युवक नेते राजेभाऊ फड यांनी पक्षाकडे उमेदवारी देण्याची मागणी केली होती. मात्र ऐनवेळी उमेदवारी नाकारण्यात आल्याने कार्यकर्त्यांत मोठी नाराजी आणि संताप व्यक्त केला जातोय. विशेष म्हणजे फड यांच्या बाजूने मतदारसंघात अनुकूल असे वातावरण होते. लोकांचा त्यांना सकारात्मक प्रतिसाद असून त्यांनी विधानसभा निवडणूक लढवावी असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात बंडखोरी अटळ मानली जात असून, राजेभाऊ फड सोमवारी सकाळी ११ वाजता आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# ओबीसींचा वाघ आता थेट मैदानात

## माधव निर्मळ यांच्या संपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे चित्र आता स्पष्ट झाले असून ओबीसींचा वाघ आता थेट मैदानात उतरला आहे. ओबीसी नेते आणि अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांच्या संपर्क कार्यालयाचे माजलगाव येथे मोठ्या थाटात उद्घाटन झाले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

. माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीकडून आमदार प्रकाश सोळंके, महाविकास आघाडी कडून मोहन जगताप तर ओबीसी समाजाकडून माधव निर्मळ, बाबरी मुंडे हे निवडणुकीच्या आखाड्यामध्ये उतरले





आहेत. ओबीसी नेते माधव निर्मळ हे अपक्ष निवडणूक लढवत आहेत. त्यांनी आपला उमेदवारी अर्ज शक्ती प्रदर्शन करत दाखल केला. रविवारी त्यांच्या माजलगाव येथील संपर्क कार्यालयाचे मोठ्या थाटामध्ये उद्घाटन झाले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक व मान्यवर उपस्थित होते. माजलगाव विधानसभा मतदारसंघातून माधव निर्मळ यांनी निवडणूक लढवावी, अशी ओबीसी समाजाची मागणी होती. ओबीसी समाजाने माधव निर्मळ यांना भेटून निवडणूक लढवण्याची विनंती केली. त्यानुसार माधव निर्मळ यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील ओबीसी समाजाची मोट बांधत आपला उमेदवारी

### एकसंघ ओबीसी निर्मळ यांच्या पाठीशी

माजलगाव मतदारसंघांमध्ये ओबीसी समाज या विधानसभा निवडणुकीत इतिहास घडवण्याच्या मूडमध्ये आहे. माधव निर्मळ यांना ओबीसी समाजाने आपला नेता म्हणून पुढे केले असून त्यांना आमदार करण्यासाठी मतदारसंघातील एक संघ ओबीसी समाज त्यांच्या पाठीशी असल्याचे चित्र आहे.

अर्ज दाखल केला. मतदारसंघांमधून ओबीसी समाजासह मुस्लिम मागासवर्गीय आणि मराठा समाजाचे समर्थन त्यांना प्रत्येक गावातून मिळत आहे. खऱ्या अर्थाने माजलगाव विधानसभा मतदारसंघात ओबीसींचा वाघ आता थेट मैदानात उतरला आहे. त्यामुळे प्रकाश सोळंके आणि मोहन जगताप यांचेही धाबे दणाणले आहे. माधव निर्मळ यांना एक गट्टा मतदान मिळवून देण्यासाठी माजलगाव मतदार संघातील प्रत्येक ओबीसी बांधव आता कामाला लागले असून मीच उमेदवार समजून प्रत्येक कार्यकर्ता आता प्रत्येक गावात जाऊन प्रत्येक मतदाराची भेट घेत आहेत. त्यामुळे माधव निर्मळ हे प्रचारामध्ये आघाडीवर आहेत. निर्मळ यांच्यापुढे सोळंके आणि जगताप टिकणार नाहीत असं वातावरण सध्या मतदारसंघांमध्ये तयार झालेले आहे. संपर्क कार्यालयाचे उद्घाटन केल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून माधव निर्मळ यांना आमदार करण्यासाठी आता प्रत्येक कार्यकर्ता कामाला लागला आहे.

# मराठा -मुस्लिम समीकरण जुळवून शेख निजाम बीड विधानसभेचे तगडे उमेदवार

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा आणि मुस्लिम राजकीय समीकरणामुळे बजरंग सोनवणे हे खासदार झाले. त्यांच्या या विजयामध्ये ठाकरे शिवसेनेने मोलाची भूमिका बजावली आहे. विधानसभा निवडणुकीत जरांगे पाटील उमेदवार देणार असल्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघात मराठा आणि मुस्लिम एकता समीकरणा नुसार शेख निजाम हे तगडे उमेदवार ठरू शकतात,



अशी जोरदार चर्चा आहे. बीड विधानसभेमध्ये प्रत्येक राजकीय पक्षाने प्रस्थापित उमेदवारांना नेहमी साथ देऊन आमदार खासदार मंत्री केले परंतु बीड विधानसभा चा हवा तसा विकास साधता त्यांना आलेला नाही मागील झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा योद्धा जरांगे फॅक्टर चांगलाच गाजला होता त्याचीच परिणीती म्हणून बजरंग सोनवणे हे बीड लोकसभेचे खासदार म्हणून निवडून गेले होते यंदा होत असलेल्या बीड विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये प्रत्येक राजकीय पक्षाने सर्वसामान्य लोक भावना लक्षात न घेता प्रस्थापित कुटुंबातील उमेदवारांनाच उमेदवारी दिलेले आहेत परंतु मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीसाठी आग्रही असलेल्या १६ उमेदवारांना मनोज जरांगे पाटील यांनी आपसात चर्चा करून एकच उमेदवार ठरवावा अशी सूचना केल्यामुळे १६ उमेदवारापैकी एकच मुस्लिम उमेदवार शेख निजाम असल्यामुळे मराठा मुस्लीम समीकरण जुळवून विजयाची खात्री शेख निजाम यांच्या रूपाने घडत असल्याचे दिसते शेख निजाम हे मोठा राजकीय सामाजिक शैक्षणिक दृष्ट्या प्रबळ असणारे व्यक्तिमत्व असून गेल्या ३० वर्षापासून प्रस्थापित क्षीरसागर कुटुंबीय यांच्या विरोधात अखंडपणे लढणारा व्यक्ती म्हणून त्यांची ओळख आहे मागील झालेल्या बीड नगर परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अत्यंत अल्पशा मतांनी त्यांचा पराभव झाला होता परंतु सर्वसामान्य लोकांमध्ये त्या झालेल्या पराभवाची सल आजही कायम आहे त्यामुळे मराठा योद्धा मनोज जारंगे पाटील यांची जर साथ मिळाली तर मराठा मुस्लिम समीकरण जुळवून शेख निजाम हे नक्कीच विजयी होतील असा सर्वसामान्य लोकांमध्ये विश्वास आहे व शेख निजाम हे बीड विधानसभेचे तगडे उमेदवार ठरू शकतात अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे.

# सुरेश धसांच्या उमेदवारी अर्जासाठी तालुक्यातील कार्यकर्त्यांची गर्दी दाटणार

**शिरूर । शंकर भालेकर**

आष्टी -पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघातून सुरेश (अण्णा) धस यांचा आज सोमवार दि. २८ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता आष्टी येथील तहसील कार्यालयामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार असल्याने धस कुटुंबावर प्रेम करणारी, निष्ठावान कार्यकर्ते, नेत्यांची शिरूर तालुक्यातून मोठी गर्दी आष्टी जाणार असल्याचे बोलले जात आहे.



आष्टी -पाटोदा -शिरूर विधानसभा मतदारसंघांमध्ये लहान थोरापासून वृद्धापर्यंत सर्वांचा थेट ओळख ठेवणारे सर्व परिचित असे व्यक्तिमत्व म्हणजे माजी मंत्री सुरेश (अण्णा) धस हे होय. गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणामध्ये सक्रिय नेतृत्व करून जनतेच्या मना मनामध्ये घर करणारा नेता म्हणून त्यांना सर्वत्र त्यांना ओळखले जात आहे. या नेतृत्वाला पुन्हा एकदा विधानसभेमध्ये जाण्याची संधी प्राप्त व्हावी, आणि जनतेच्या सेवेसाठी त्यांना पुन्हा एकदा आमदार करन्यात यावं यासाठी त्यांचे शिरूर तालुक्यातीलच नव्हे तर संपूर्ण मतदार सर्व नेते,कार्यकर्ते एकवटले आहेत. पक्षश्रेष्ठीच्या निर्णयांमध्ये जरी धसानां उमेदवारीचे तिकीट देण्यासाठी डावले गेले असले तरी, जनता त्यांच्या पाठीशी भक्कम उभी असल्याचे सांगितले जात आहे. म्हणूनच सोमवार दि. २८ ऑक्टोबर रोजी आष्टी तहसील कार्यालयासमोर नेते, कार्यकर्ते आणि मतदार बांधवांची मोठी गर्दीत दाटणार असल्याचे हे सांगितले जात आहे.

### आपल्या नेत्याचा अर्ज दाखल करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहा - ज्येष्ठ नेते शहादेव खेडकर

**आष्टी -पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघातील गोरगरीब जनतेच्या मनामध्ये घर करणारा नेता म्हणजे सुरेश आण्णा धस हे होय. हा नेता प्रत्येकाला आपला नेता वाटतो म्हणून मतदार संघातील गावागावा मधून सुरेश आण्णा धस यांना उमेदवारी द्यावी यासाठी कार्यकर्ते मतदार बांधवातून मोठी मागणी होत आहे. मात्र अशा नेत्याला डावलून पक्षश्रेष्ठी वेगळाच निर्णय घेऊ पाहत आहे. आपल्या नेत्यावर अन्याय होत असल्याने या नेत्याचे हात बळकट करण्यासाठी तमाम मतदार संघातील जनतेने सोमवार दि. २८ ऑक्टोबर रोजी आष्टी येथील तहसील कार्यालयासमोर आपल्या नेत्याचा अर्ज दाखल करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धस अण्णा च्या पाठीमागे मोठी वज्रमुठ निर्माण करावी असे आवाहन भाजपा ज्येष्ठ नेते तथा सावरगाव चकला या ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शहादेव खेडकर, विद्यमान सरपंच सागरबाई शहादेव खेडकर, अरुण खेडकर, विठ्ठल बुधवंत,चंद्रकांत खेडकर, गोविंद बांगर, राहुल खेडकर, अशोक खेडकर, भगवान गायकवाड,सचिन गायकवाड, सोमनाथ गायकवाड,महादेव गायकवाड, दादा गायकवाड, अण्णासाहेब शिरसाठ, नवनाथ खेडकर, अशोक शिरसाट, पोपट खेडकर, सुमंत राख, भागवत खेडकर, अंबादास खेडकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.**

# सुरेश धस यांचा ऊमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित रहा: सय्यद

पाटोदा। प्रतिनिधी

लोकनेते सुरेश (आण्णा) धस यांचा २८ तारखेला सोमवारी सकाळी बारा वाजता अर्ज दाखल करण्यात येत आहे तरी सर्व आष्टी पाटोदा शिरुर मतदार संघातील जनतेला अण्णांचे हात बळकट करण्यासाठी उपस्थित राहावे नम्र विनंती युवानेते सय्यद शहाबाज यांनी केली आहे

कोरोना काळामध्ये बाप मुलापाशी जात नव्हता आणि मुलगा बाबा पाशी जात नव्हता पण तुम्हाला भेटण्यासाठी एकच व्यक्ती येत होते ते म्हणजे आदरणीय सुरेश (आण्णा )धस ,राजकीय पातळीवर नेता कसा असावा त्याची जनतेशी नाळ कशी जोडलेली असावी याचे जर उदाहरण द्यायचे झाले तर बीड जिल्ह्यात धस कुटुंबीय अगदी पिढया पार जनतेच्या सुखात दुःखात प्रत्येक अडचणीत समोर जाऊन मदत



करणारे हे धस कुटुंब स्व रामचंद्र धस दादा हे देखील प्रत्येकाच्या सुखात दुःखात सहभागी व्हायचे . . हीच परंपरा जोपासली माजी मंत्री सुरेश अण्णा धस यांनी म्हणूनचं म्हणावं वाटते समोरुन येऊद्या कीतीही सतरा साठ आमचा नेता एकटा बास , सर्व समाज घटकाला सोबत घेऊन चलणारे व सर्व सामान्य जनतेला योग्य न्याय देणारे कोणाचेही काम असो जात पात न बघता काम करणारे पाटोदा शिरूर आष्टी घरकुल, रस्ते व विविध विका

◀◀ पान ३ वर

# माजलगाव विधानसभा निवडणूक अपक्ष लढवणार - प्रा.ईश्वर मुंडे

धारूर। प्रतिनिधी

देशाचे नेते पद्म विभुषण खा.शरदचंद्र पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी पदावरून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात धारूर तालुकाक्षध्य,ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस,सेवा निवृत्त अधिकारी सेल राज्य प्रमुख या पदावर पक्षाचे सक्रीय काम करून खा.शरदचंद्र पवार साहेबांचे व पक्षाचे विचार वाडी,वस्ती, तांड्यापर्यंत पोहचवले.सन.२०१९ ला माजलगाव मतदार संघाचा आमदार निवडून आनला.पक्ष फुटल्यानंतर ही निष्ठेने खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षातच राहीलो.८० टक्के समाजकारण



व २० टक्के राजकारण करून जन सामान्यांच्या मनात घर केलेले आहे.

मागे सन २०२१ ला छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघात उमेदवारी मागणी केलेली होती,२०२४ ला बीड लोकसभा मतदार संघात जनसंपर्क वाढवून बीड लोकसभेच्या उमेदवारीची मागणी केलेली होती.वरील दोन्ही वेळी मला पक्षाने आपला नंतर विचार करू असे सांगून थांबवले.आता सन २०२४ च्या माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी पक्षाकडे रितसर उमेदवारीची मागणी करून माजलगाव मतदार संघातील शंभर गावात जन संवाद दौरा करून पक्षाचे कार्य वाढवलेले आहे.माझ्या परिचय पत्राच्या पन्नास हजार प्रति मतदार संघातील सर्व गावांमध्ये वाटप केलेल्या आहेत. या वेळी माजलगाव मतदार संघात माझ्या विषयी मतदारांमध्ये सहानुभूती असून पक्षाने आपणास संधी द्यावी अशी जन भावना होती. या मुळे मी निश्चित निवडणूक जिंकू शकत

◀◀ पान ३ वर

# माजलगाव विधानसभा निवडणुक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा निवडणूक २०२४ माजलगाव मतदारसंघात दिनांक २६ ऑक्टोबर रविवार रोजी निवडणूक कर्तव्यावर नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी याचे प्रथम प्रशिक्षण पार पडले.

कर्तव्यावर नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना प्रशिक्षणा दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी गौरव ईंगोले यांनी सर्व मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकरी यांना विधानसभा निवडणूक कार्यक्रम निवडणूक कर्तव्यावर नियुक्त मतदान अधिकरी याच्या जबाबदाऱ्या, साधारण कायदेविषयक मार्गदर्शन केले.सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार माजलगाव संतोष रुईकर यानी मतदान केंद्रावर विविध अहवाल तयार करणे,केंद्राध्यक्ष याचे डायरी,मतदान हिशोब अहवाल १७ क ,व सवैधानिक ,असवैधानिक अहवाल सादर करताना घ्यावयाची काळजी यावर मार्गदर्शन केले,प्रत्यक्ष मतदान यंत्र कार्य प्रणाली,हाताळणी ,स्वतंत्र क्लासरूम प्रशिक्षण देण्यात आले .तहसिलदार धारूर



श्रीकांत निळे यानी मतदान केंद्रावर कामकाज करणे ,घ्यावयाची दक्षता याच्यावर सुचना दिल्या.यावेळी महिंद्रकर तहसीलदार वडवणी,निवडणूक नायब तहसीलदार अडसूळ,लक्ष्मण, धस,नायब तहसीलदार पाळवदे,क्षेत्रीय अधिकारी,मास्टर ट्रेनर,महसूल अधिकारी यांनी काम पाहिले.

# राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन घडवण्यासाठी पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे - डॉ. शर्मा

## मविआच्या उमेदवारांना विजयी करण्याचा पदाधिकारी - कार्यकर्त्यांचा निर्धार

जालना । प्रतिनिधी

जिवनावश्यक वस्तूंचे वाढलेले दर, मोठ्या प्रमाणात बोकाळलेली बेरोजगारी, गुन्हेगारीचे वाढलेले प्रमाण यामुळे राज्यातील महायुती सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. राज्याच्या सत्ताकारणात परिवर्तन घडवून आणण्यासाठी इंडिया महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन काँग्रेस पक्षाचे जालना लोकसभा प्रभारी माजी मंत्री डॉ. पी. सी. शर्मा यांनी आज रविवारी येथे बोलतांना केले.



जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांच्या निवडणुक प्रचाराचे नियोजन करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक आज रविवारी दुपारी आयोजीत करण्यात आली होते. या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, जालना विधानसभेचे उमेदवार आ. कैलास गोरंट्याल,

◀◀ पान ३ वर

### राज्यात परिवर्तन करण्यासाठी गोरंट्याल यांना विजयी करा : खा. कल्याण काळे

राज्यातील सत्तेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी अत्यंत पोषक वातावरण असून त्यासाठी जालन्यातून इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन खा. डॉ. कल्याण काळे यांनी येथे बोलतांना केले. यावेळी ते पुढे म्हणाले की, जालना शहर व जिल्ह्यातील अनेक महत्वाचे प्रश्न प्रलंबित आहेत. ते प्रश्न सोडवून घेण्यासाठी राज्यात आपल्या विचाराचे सरकार असणे गरजेचे आहे. गोरंट्याल हे रोखठोक बोलणारे असून एखांदे काम होत असेल तर ते हो म्हणतात. त्यांचा स्पष्ट वक्तेपणा लोकांना भावतो. जालन्यासह जिल्ह्यातील पाचही जागेवर इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होईल अशी सकारात्मक वातावरण असून पदाधिकारी कार्यकर्त्यांनी येणारे पंधरा दिवस चांगले कष्ट आणि प्रयत्न करून गोरंटयाल यांच्यासह मविआच्या सर्व उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन शेवटी डॉ. काळे यांनी केले.

# राजकारणाने समाजाची घडी विस्कटली

बीड जिल्ह्यातील नव्हे तर मराठवाडयासह संबंध महाराष्ट्रातील राजकारणाची घडी विस्कटत चाललेली आहे. बीड जिल्ह्याने क्रांतिसिंह नाना पाटील स्व. बबनराव ढाकणे या पर जिल्ह्यातील नेत्यांना खासदार म्हणून निवडून दिले होते तसेच स्व. सुंदरराव सोळंके यांना बिनविरोध आमदार म्हणून विधानसभेत पाठवले होते. अशा प्रकारचा इतिहास असणाऱ्या बीड जिल्ह्यात राजकारण खालच्या पातळीला गेले आहे. समाजकारणातून राजकारण किंवा राजकारणातून समाजकारण हे समीकरण आता संपले आहे.



बीड जिल्ह्यातील बहुतांशी गोरगरीब जनता ऊस तोडणीसाठी पर जिल्ह्यामध्ये जातात त्या ठिकाणी कबाड कष्ट करून आपल्या पोटाची खळगी भरतात. या सर्व गोरगरीब अठरापगड जातीच्या लोकांना न्याय देण्यासोबतच सर्व जाती धर्माच्या जनतेला एका माळीमध्ये गुफंण्याचे व एक जुटीने ठेवण्याचे काम स्व. मुंडे साहेबांनी केलेले आहे. म्हणून गोरगरीब जनता मुंडे साहेबांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा होती.

या जिल्ह्यामध्ये स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी कमी शिक्षण असुन सुद्धा शैक्षणिक क्षेत्रामध्ये नावलौकिक केले आहे. त्यांनी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अठरापगड जातीच्या लोकांना नौकरीची संधी उपलब्ध करून दिली आहे. काकुच्या काळात शिवाजीराव दादा पंडीत, अशोकराव पाटील, स्व. बाबुराव आडसकर, स्व. विमलताई मुंदडा माजी आमदार भीमराव धोंडे, प्रकाशदादा सोळंके या नेत्यांनी जिल्ह्यासाठी फुल नाही फुलाची पाकळी म्हणून जिल्ह्याच्या जडणघडणीत आपला खारीचा वाटा उचलला आहे. स्व. लोकनेते सुंदरराव सोळंके यांनी माजलगाव सारखे धरण उभारुन हरीत क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली आहे. स्व. सुंदरराव सोळंके आणि स्व. गोपीनाथराव मुंडे या दोन्ही लोकनेत्यांनी उपमुख्यमंत्री पर्यंत मजल मारली होती परंतु दोन्ही वेळेस आपल्या जिल्ह्याचे दुर्दैव नशीबी आले. सोळंके साहेबांना पराभव स्वीकारावा लागला तर मुंडे साहेबांचे अपघाती निधन झाले.

बीड जिल्ह्यातील बुजुर्ग मंडळी राजकारणातून निवृत्त झाली. ज्या त्या कुटुंबातील नवीन चेहऱ्यांना संधी भेटली परंतु राजकीयदृष्ट्या ◀◀ पान ३ वर

**केशवराव आंधळे**

अध्यक्ष - मोहटादेवी सेवाभावी संस्था पिंपळारुई ता. वडवणी

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शरद पवारांचा मेगाप्लॅन, मोहोळमध्ये २६ वर्षीय सिद्धी कदम यांना उमेदवारी, सर्वात कमी वयाच्या उमेदवार ठरण्याची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचंड कामात व्यस्त आहेत. शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीसाठी पद्धतशीरपणे रणनीती आखली आहे. शरद पवार यांनी मोहोळसाठी ज्या उमेदवाराची घोषणा केली ते पाहून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. खरंतर शरद पवार यांचा यामागे एक चांगला विचार असण्याची शक्यता आहे. पण शरद पवार यांच्या पक्षाने जाहीर केलेला मोहोळचा उमेदवार जिंकून आला तर महाराष्ट्राच्या राजकारणात नवा रेकॉर्ड लिहला जाऊ शकतो. शरद पवार यांच्या पक्षाने मोहोळ मतदारसंघात माजी आमदार रमेश कदम यांच्या कन्या सिद्धी कदम यांना उमेदवारी जाहीर केली आहे. रमेश कदम हे जामिनावर बाहेर आहेत. अण्णाभाऊ साठे आर्थिक महामंडळात झालेल्या घाटोळा प्रकरणात रमेश कदम यांना सलग ८ वर्षे जेलमध्ये राहावं लागलं. याशिवाय आगामी काळात त्यांचा जामीन रद्द झाला तर पुन्हा जेलमध्ये जावं लागलं तर त्यांची आमदारकी धोक्यात येऊ शकते. यामुळे शरद पवार गटाने रमेश कदम यांच्या कन्या सिद्धी कदम यांना उमेदवारी दिल्याची चर्चा आहे.

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळमधून



शरद पवार गटाकडून माजी आमदार रमेश कदम यांची कन्या सिद्धी कदम यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. सिद्धी कदम या महाराष्ट्रातील सर्वात कमी वयाच्या उमेदवार असण्याची शक्यता आहे. २०१९ च्या विधानसभेदरम्यान रमेश कदम जेलमध्ये असताना कन्या सिद्धी कदम यांनी प्रचाराची धुरा सांभाळली होती. आता त्यांना शरद पवार गटाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे मोहोळ विधानसभेत अजित पवार गटाचे यशवंत माने विरुद्ध शरद पवार गटाच्या उमेदवार सिद्धी कदम असा सामना रंगणार आहे.

जावयांना आमदार करण्यासाठी सासऱ्यांनी फिल्डिंग?

दरम्यान, खेड आळंदी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून शिवसेनेला मतदारसंघ सुटल्याने राष्ट्रवादी शरद पवार गटात खळबळ उडाली आहे. त्यामुळे खेड आळंदीत महाविकास आघाडीत बंडोखोरीची शक्यता आहे. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अतुल देशमुख यांनी मेळावा आयोजित करुन प्रचंड शक्तिप्रदर्शन केलं. या मेळाव्यात अतुल देशमुख निवडणुकीबाबत आपली भूमिका जाहीर करणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचं वातावरण होतं. या मेळाव्यात भाषण करताना अतुल देशमुख यांनी मोठा गौप्यस्फोट केला. खेड आळंदी विधानसभा मतदारसंघात दोन बड्या नेत्यांच्या जावयांना आमदार करण्यासाठी सासऱ्यांनी फिल्डिंग लावल्याचा गौप्यस्फोट अतुल देशमुख यांनी केला.

अतुल देशमुख शरद पवार गटाचे प्रबळ दावेदार आहेत. खेड आळंदी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारीचा तिढा कायम असताना भोसरीचे आमदार विलास लांडे यांनी जावई सुधीर मुंगसेंना आमदार करण्यासाठी महाविकास आघाडीत फिल्डिंग लावली आहे, असा दावा अतुल देशमुख यांनी केला आहे. तसेच यावरुन अतुल देशमुखांनी विलास लांडेंना थेट सुनावलं आहे. काळजी करु नका खेड आळंदीचा निकाल अतुल देशमुखच ठरवणार, असं म्हणत अतुल देशमुखांनी भोसरीचे आमदार विलास लांडे, तसेच खेडचे नेते नानासाहेब टाकळकर यांना थेट आव्हान दिलं आहे. अतुल देशमुखांनी मेळावा घेत भूमिका जाहीर केली आहे. आपण राष्ट्रवादी शरद पवार गटातच रहाणार असल्याचे देखील त्यांनी जाहीर केलं आहे.

# सात जणांवर दोषारोप निश्चितीचा मसुदा सादर

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघातामधील अल्पवयीन मुलांचे रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट केल्याप्रकरणात आरोपी असलेले अग्रवाल दांपत्य आणि ससूनच्या डॉक्टरांसह एकूण सात जणांवर दोषारोप निश्चितीचा मसुदा पोलिसांनी न्यायालयात सादर केला आहे.

विशेष न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक व मुलाचे वडील विशाल अग्रवाल, आई शिवानी अग्रवाल, ससूनच्या न्यायवैद्यक विभागाचा प्रमुख डॉ. अजय तावरे, आपत्कालीन विभागाचा मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर, शिपाई अतुल घटकांबळे, अश्पाक मकानदार, अमर गायकवाड अशा एकूण सात आरोपींवर दोषारोप निश्चित केले आहेत. या दोषारोप निश्चितीचा मसुदा पोलिसांनी न्यायालयात सादर केला आहे. तसेच पोर्श कार अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाच्या दोन अल्पवयीन मित्रांना वाचविण्यासाठी यापूर्वी अटक करण्यात आलेला आरोपी आदित्य सूद आणि आशिष मित्तल यांनी ससूनच्या डॉक्टरांना लाच दिली. त्यानंतर आदित्य सुदने एका मुलाच्या रक्ताच्या नमुन्यांच्या जागी स्वतःच्या रक्ताचा नमुना दिला तर आशिष मित्तलने आरोपी अरुणकुमार सिंग याच्या सांगण्यावरून दुसऱ्या मुलाच्या जागी स्वतःचे रक्त दिल्याचे पोलिस तपासात उघड झाले.

अरुणकुमार सिंग फरार घोषित करण्यासाठी अर्ज

सूद आणि मित्तल यांचा या गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट झाल्यानंतर सिंग फरार आहे. सुरुवातीला त्याला अंतरिम अटकपूर्व जामीन मिळाला होता. मात्र उच्च न्यायालयाने त्याचा अटकपूर्व जामीन फेटाळला आहे. त्यामुळे अरुणकुमार सिंग याला फरार घोषित करण्यासाठी भारतीय दंडविधान कलम ८२ अंतर्गत अर्ज केला असल्याची माहिती विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनी दिली. या प्रकरणाची पुढील सुनावणी सहा नोव्हेंबरला होणार आहे.

पासवर्ड असल्याने मोबाईल सुरू करता आले नाहीत रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी पोलिसांनी डॉ. श्रीहरी हाळनोर आणि शिपाई अतुल घटकांबळे यांचे मोबाईल जप्त केले होते. त्यांच्या मोबाईलला पासवर्ड आहे. त्यामुळे त्या मोबाईलमधील डेटा तपासता आलेला नाही. यासंदर्भात दोघांची चौकशी करायची आहे. त्यासाठी परवानगी मिळण्यासाठी पोलिसांनी न्यायालयात अर्ज केला आहे. न्यायालयाने पोलिसांना दोघांची चौकशी करण्यासाठी परवानगी दिली आहे.

# 'रेव्ह पार्टीत २१ मुले तर १४ मुली सापडल्या' आयोजक दक्षिणच्या दिग्गज नेत्याचा 'नातेवाईक'

**पुणे । प्रतिनिधी**

तेलंगणातील सायबराबादमध्ये रेव्ह पार्टीचा पर्दाफाश झाला आहे. एका हायप्रोफाईल छाप्यात फार्महाऊसवर रेव्ह पार्टी करणाऱ्या ३५ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या रेव्ह पार्टीचे कनेक्शन केटीआरच्या जवळच्या लोकांशी जोडले जात आहे.

माहितीनुसार, तेलंगणाचे माजी मंत्री केटी रामाराव (घढठ) यांचे नातेवाईक मानल्या जाणाऱ्या राज पकाला यांच्या जनवाडा फार्महाऊसवर टाकलेल्या हाय-प्रोफाइल छाप्यात अवैध दारू आणि ड्रग्जचा वापर उघड झाला आहे. ही कारवाई नरसिंगी पोलिस, स्पेशल ऑपरेशन टीम (एसओटी) आणि उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे केली. मकिला पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या या फार्महाऊसमध्ये रेव्ह पार्टी सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर छापा टाकण्यात आल्याचे सांगण्यात आले.

रात्री उशिरा झालेल्या या छाप्यात अधिकाऱ्यांनी पार्टीत उपस्थित असलेल्या ३५ जणांना ताब्यात घेतले, त्यात २१



पुरुष आणि १४ महिलांचा समावेश होता. तपासादरम्यान १०.५ लिटर विदेशी दारूच्या सात बाटल्या आणि परवाना नसलेल्या भारतीय दारूच्या दहा बाटल्याही जप्त करण्यात आल्या. हे राज्याच्या उत्पादन शुल्क कायद्याचे उल्लंघन आहे.

संशयाच्या आधारे, अधिकाऱ्यांनी पार्टीत उपस्थित लोकांची ड्रग टेस्ट केली, ज्यामध्ये विजय मदुरी नावाच्या व्यक्तीला कोकेन पॉझिटिव्ह आढळून आले. मदुरीला पुढील चाचण्यांसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले असून एनडीपीएस कायद्याच्या कलम २७ नुसार त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


फार्महाऊस मालक राज पाकला यांच्या विरोधात कलम ३४(-), ३४(१) आणि उत्पादन शुल्क कायद्याच्या कलम ९ अंतर्गत परवान्याशिवाय मद्य सेवा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर फार्महाऊसवर अवैध दारू पुरवठा आणि अंमली पदार्थांचा वापर याप्रकरणी कसून चौकशी सुरू करण्यात आली असून, पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

# चोरट्यांची पण कमालच! माती उकरून थेट कंपनीमध्ये केला प्रवेश

**पुणे । प्रतिनिधी**

घरफोड्या करणाऱ्या चोरट्यांनी धुमाकूळ घातलेला असताना त्यांच्याकडून नवनवीन शक्कल देखील लाढवल्या जात असून, वाघोलीत बंद कंपनीचे शटर किंवा कुलूप न उचकटता माती उकरून कंपनीत प्रवेश केला अन् १७ लाख ५१ लाखांचा ऐवज चोरून नेल्याचा प्रकार घडला आहे. दरम्यान, लोणीकंद परिसरात गेल्या काही दिवसांत घरफोड्या करणाऱ्या चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातल्याचे दिसत आहे. याप्रकरणी लोणीकंद पोलीस ठाण्यात संदीप गुरव (वय ५०) यांनी तक्रार दिली आहे. त्यानूसार, अज्ञात चोरट्यांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार संदीप गुरव यांची नगर रस्त्यावरील वाघोलीत गट नं. ८०८ मध्ये अँग्रीको एनर्जी रेंटल इंडिया प्रा.लि. कंपनी आहे. तांब्याचे केबल तसेच इतर इलेक्ट्रीकल्स वस्तू बनविले जातात व विक्री होते. त्यांच्या कंपनीला चारही बाजूने मोठे पत्र्याचे शेड मारलेले आहे. दरम्यान, मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी कंपनीच्या पाठिमागून पत्र्याच्या खालून माती उकरली. आणि आत जाण्यासाठी जागा बनविली. तर, पत्र्याचे



नटबोल्ट काढून पत्रा उचकटून आत प्रवेश केला. तसेच, १७ लाख ५१ हजार रुपयांचे ७३ तांब्याचे केबल चोरून नेले आहे. सकाळी हा प्रकार समोर आल्यानंतर याची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी करून गुन्हा नोंद केला आहे. पोलिसाकंडून चोरट्यांचा माग काढला जात आहे.

पुण्यात चोरट्यांचा सुळसुळाट

पुण्यात चोरट्यांचा सुळसुळाट झाला आहे. लूटमार चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. चोरट्यांनी पुण्यातील प्रसिद्ध चितळे बंडू मिठाईवआले यांच्या औंध-बाणेर रस्त्यावरील दुकानावर दरोडा टाकला आहे. दुकानाचे शटर उचकटुन चोरट्यांनी रोख व काही साहित्य लंपास केले आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. मिळालेल्या अधिक माहितीनुसार, पोलिसांनी घटनास्थळी जात पंचनामा केला आहे. तसेच चोरट्यांच्या शोध घेण्यासाठी तपास पथके रवाना करण्यात आली आहे. चोरट्यांनी दुकानातील मोठी रक्कम लंपास केली असल्याचं देखील उघड झालं आहे.

# कमल व्यवहारेंची काँग्रेसला सोडचिट्टी! धंगेकरांची डोकेदुखी वाढली?

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी याद्या जाहीर झाल्यानंतर कसबा विधानसभा मतदारसंघातून भाजप आणि काँग्रेस दोन्ही पक्षांमध्ये नाराजी उफाळून आल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपमधून रासने यांना उमेदवारी मिळाल्यानंतर कुणाल टिळक आणि धीरज घाटे यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. दुसरीकडे काँग्रेसने रवींद्र धंगेकर यांना पुन्हा उमेदवारी दिल्यानंतर काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या कमल व्यवहारे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत बड्डांचे निशान फडकवले आहे.



कसबा विधानसभा मतदारसंघात धंगेकर विरुद्ध रासने असा सामना पुन्हा एकदा पाहायला मिळणार हे निश्चित झाला आहे. रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आता भाजपने रासनेंना त्यांच्या विरोधात मैदानात उतरवले आहे. रासने यांना उमेदवारी दिल्याने भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे नाराज झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. धीरज घाटे यांनी फेसबुक वर पोस्ट करत आपली नाराजी व्यक्त केली आहे. फेसबुक पोस्टमध्ये धीरज घाटे म्हणाले, तुम्हाला हिंदुत्ववादी सरकार हवय पण तीस वर्ष हिंदुत्वासाठी देणारा कार्यकर्ता उमेदवार म्हणून नकोय शब्दात घाटे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तर दुसरीकडे कसबा विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांची देखील डोकेदुखी वाढली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेत्या कमल व्यवहारे यांनी पक्षाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवत आगामी विधानसभा निवडणुकीत उतरण्याची तयारी केली आहे. कमल व्यवहारे यांचे सध्या एक पत्रक व्हायरल होत आहे. त्यामध्ये १० वर्षात ५ पक्ष बदलून आलेली मंडळी पक्षापेक्षा स्वतःला मोठी समजू लागल्याचा फटका लोकसभेला बसला, आता त्यांना कसबा विधानसभेचे उमेदवारी देण्यात आलं असल्याचं म्हणत कमल व्यवहारे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान कमल व्यवहारे या काही दिवसांपूर्वी संभाजी राजे छत्रपती यांच्या भेटीला गेल्या होत्या त्यामुळे त्या तिसऱ्या आघाडीच्या उमेदवार होऊ शकतात अशा चर्चा आहेत. तस न झाल्यास त्या अपक्ष म्हणून देखील निवडणूकीला रिंगणात उतरण्याची तयारी करत असल्याचे बोलले जात आहे.

# काठापुरातील गणेश पुराण कथा सोहळ्यास गर्दी

**पुणे । प्रतिनिधी**

काठापूर बुद्रुक (ता.आंबेगाव) येथील भोकरवाडी (गणेशनगर) येथे श्री गणेश पुराण संगीतमय कथा सोहळा आयोजित केला असून कविराज महाराज झावरे (पारनेर) यांच्या माध्यमातून दररोज संगीतमय कथा संपन्न होत आहे. यावेळी काठापूर बुद्रुक, जारकरवाडी, पोंदेवाडी व पारगाव येथील शेकडो ग्रामस्थ गर्दी करीत आहेत.

श्री गणेश, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या मूर्ती प्रतिष्ठापनेच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त संगीतमय गणेश पुराण कथा सोहळ्याचे आयोजन केले आहे. कविराज महाराज झावरे यांना संगीताची साथ शिवनाथ पवार, हरिदास बोराडे, आकाश वाडेकर, अमोल महाकाळ, अजित साळवे, बाळकृष्ण भोर, किरण वाडेकर हे करत आहेत. दररोज या ठिकाणी कथा संपल्यानंतर सुमारे एक हजार नागरिकांना महाप्रसाद दिला जातो. स्थानिक कलाकारांच्या माध्यमातून या ठिकाणी नाट्य रंगवली जात आहे.

कथेच्या आयोजनामध्ये माजी उपसरपंच विशाल करंडे, विठ्ठल करंडे, कचर करंडे, संतोष यशवंत करंडे, सोमनाथ करंडे, सोमनाथ हिंगे, लहू करंडे, शिवाजी करंडे, फकीर करंडे, निवृत्ती करंडे, गोपाळ करंडे, एकनाथ करंडे, संपत करंडे, ज्ञानेश्वर करंडे, दत्तात्रेय करंड यांसह ग्रामस्थ व महिला मंडळ व्यवस्था पाहत आहेत.

# गरीबी निर्मूलनासाठी उपाययोजना राबविण्याची गरज-प्राचार्य डॉ. प्रमोद धिवार

**पुणे । प्रतिनिधी**

सामान्य घटकाची सामाजिक प्रतिष्ठा, सामाजिक समता, शोषित, पिडीत, दलित, स्त्री सन्मान, स्त्री पुरुष समानता, महिला सुरक्षितता, थर्ड जेंडर, तळागाळातील सामन्यातील सामान्य घटक या सर्वांना शिक्षण, चांगले आरोग्य या सर्व बाबींचा विचार आर्थिक समृद्धी आणि गरिबांचा विकासाच्या बाबतीत करणे आवश्यक आहे, असे मत कोंढवा बुद्रुक येथील श्रीमती कलावती कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद धिवार यांनी व्यक्त केले.

गोपाळ किरण समाज सेवी संस्था (मध्यप्रदेश) व हिंदी विभाग, कुरुक्षेत्र विश्वविद्यालय (हरियाणा) यांच्या संयुक्त विद्यमाने हरियाणा येथे आर्थिक समृद्धी आणि गरिबी निर्मूलन या विषयावर एक दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. यात विशेष अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. प्रमोद धिवार यांना निमंत्रित केले होते. यावेळी जपान येथील संरक्षक तथा हिंदी की गुंजच्या संपादक डॉ. रमा शर्मा, नवी दिल्लीतील अवर सचिव लक्ष्मी चंद गौतम, कुरुक्षेत्र विश्व विद्यालयाच्या डीन तथा हिंदी विभागप्रमुख डॉ. पुष्पा रानी, पंजाबी भाषा विभागप्रमुख डॉ. कुलदीप सिंग, जीकेएसएसएसचे अध्यक्ष श्रीप्रकाश सिंह निमराजे यांच्यासह हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र विभागाचे अनेक प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ प्रमोद धिवार यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल ग्लोबल डायमंड आयकॉन अचीवर्स अवॉर्ड २०२४ हा राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक संदीप बधे, अध्यक्षा प्रिती बधे, सचिव डॉ. किरण गोरे व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांनी प्राचार्य डॉ. प्रमोद धिवार यांचे अभिनंदन केले आहे. गरिबी निर्मूलन म्हणजे नेमके काय करायचे आहे, आपण नेमके गरीब कोणाला समजतो, गरीब म्हणजे नेमके कोण आहे, गरीबी निर्मूलन झाले काय? असे प्रश्न उपस्थित करून विषयाची परखडपणे मांडणी केली. गरीबी निर्मूलनासाठीच्या उपाययोजनाही डॉ. प्रमोद धिवार यांनी सांगितल्या.

# मराठी भाषा येत नसल्याचा गैरफायदा घेत तिघांकडून तरुणीची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

तरुणीला मराठी भाषा येत नसल्याचा गैरफायदा घेऊन तिघांनी मराठी भाषेतून पत्र तयार केले. पत्र व्यवहार करण्यासाठी संमतीपत्र असल्याचे सांगून कुलमुख्त्यार पत्रावर सही करुन १ कोटी रुपयांच्या मिळकतीचा व्यवहार करुन फसवणूक केली. याप्रकरणी घोरपडी गावातील २७ वर्षाच्या तरुणीने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी तुषार हिम्मत कवडे (रा. श्रीनाथनगर, घोरपडी), पॉल पिटर फ्लेरो (रा. घोरपडी) आणि सुरेश त्रिंबक पाळवदे (रा. थिटेवस्ती, खराडी) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २४ एप्रिल ते ऑगस्ट २०२४ दरम्यान घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी यांनी संगनमत करुन फिर्यादीच्या मिळकतीचा व्यवहार करुन देतो, असे सांगून विश्वास संपादन केला. फिर्यादी यांचा मराठी भाषेविषयी असलेल्या अज्ञानाचा फायदा घेऊन, दिशाभूल करुन पत्रव्यवहार करण्यासाठी संमतीपत्र घेतो, असे सांगून कुलमुख्त्यार पत्र घेतले.

फिर्यादीच्या मालकीची घोरपडीतील अंदाजे १ कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमत असलेल्या मिळकतीचा बनावट दस्त बनविला. त्यावर फिर्यादी यांचा कुलमुख्त्यार पत्रावरील फोटोवरुन कलर फोटो काढला. बनावट सही व अंगठा करुन या मिळकतीचा व्यवहार केला. त्याचा कोणताही लाभ फिर्यादीला न देता फसवणूक केली. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगताप तपास करीत आहेत.

संबंधीत तरुणी कर्नाटक येथे शेती करते. हे घर तिच्या आईवडिलांनी घेतले होते. त्यांचा २०१५ मध्ये मृत्यू झाल्यावर हे घर तिच्या नावावर झाले. तिने तेथे भाडेकरु ठेवले होते. मात्र भाडे कमी मिळत असल्याने तिने भाडेकरुंना घर खाली करण्यास सांगितले. मात्र ते घर खाली करत नव्हते. तेव्हा नातेवाईक फ्लेरो यांनी ओळखीच्या कवडे मार्फत घर खाली करुन देतो असे सांगितले. यानंतर पोलीस ठाण्यात भाडेकरुविरुध्द तक्रार ही देण्यास सांगितले. यादरम्यान तिघांनी मिळून मिळकतीची काही कागदपत्रे तयार करायची असल्याचे सांगत कुलमुखत्यार पत्रावर सह्या घेतल्या होत्या.

# दिवे घाटातून प्रवास करत असाल तर सावधान! वाहतुकीसाठी आहे का सुरक्षित?

**पुणे । प्रतिनिधी**

दिवे घाटात गुरुवारी (दि. २४) रात्री भर रस्त्यावर मोठे दगड आणि काही प्रमाणात दरड कोसळल्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाल्याची घटना घडली होती. यामध्ये सुदैवाने जीवितहानी झाली नाही. शनिवारी (दि. २६) पहाटे पुन्हा दुधाचा टँकर पीएमपीएमएल बसवर आदळून कित्येक प्रवासी जखमी झाले. यामध्ये बसचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सलग दोन दिवसांत दोन घटना घडल्याने दिवे घाटातील वाहतूक सुरक्षित आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. आगामी काळात दिवे घाटातील दरड कोसळू नये यासाठी प्रशासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

साहित्यिक शब्दात दिवे घाटाचे वर्णन सुंदर केले जाते. संत ज्ञानेश्वर महाराजांची वारी याच घाटातून जाते, याच घाटाच्या पायथ्यालगत ऐतिहासिक मस्तानी तलाव आहे. नागमोडी वळणाचा आणि हिरवाईने नटलेला दिवेघाट पाहण्यासाठी दररोज हजारो नागरिक येथे गर्दी करतात. मात्र वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे दिवे घाटातील प्रवास सुखकर आहे का? याबाबत प्रसिद्धी माध्यमांनी वेळोवेळी आवाज उठविला आहे. दिवे घाटातील अपघात रोखणे, घाटातून कोसळणारे मोठाले दगड बाजूला करून टाकणे अशा सूचना प्रशासनाला वारंवार दिलेल्या



असताना प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आले आहे. त्यामुळे दिवे घाटात मोठी घटना घडण्याची प्रशासन वाट पाहत आहे काय? अशा शब्दात नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

पालखी सोहळा प्रमुखही वारकऱ्यांच्या सुरक्षेबाबत अनभिज्ञ

दरवर्षी संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा तोंडावर आला की, तालुका आणि जिल्हा प्रशासन तसेच पालखी सोहळ्याचे विश्वस्त पालखी मार्गाची पाहणी करतात. पालखी मार्गाची पाहणी करताना वास्तविक पाहता दिवे घाटाच्या सुरक्षेकडे लक्ष देणे आवश्यक असताना केवळ पालखी मुक्काम आणि विसावा ठिकाणांची पाहणी होते. दिवे घाटात दरड कोसळण्याची शक्यता असून संपूर्ण घाटात डोंगराच्या बाजूने जाळी बसविणे, ज्या भागातील दगड कोसळण्याची शक्यता आहे तेथील दगड बाजूला हटवून रस्ता सुरक्षित करणे आवश्यक आहे. मात्र याबाबत प्रशासनाने फारसा गांभीर्याने कधी विचार केलाच नाही. एवढेच काय पण पालखी सोहळा प्रमुखही वारकऱ्यांच्या सुरक्षेबाबत अनभिज्ञ राहिले आहेत.

अपघातांच्या प्रमाणात वाढ

दिवे घाटात संत नामदेव महाराज यांच्या वंशजांचा काही वर्षापूर्वी अपघातात मृत्यू झाला होता. अनेक एसटी बस, दुचाकी, चारचाकी वाहनांचे अपघात कित्येकवेळा घडले आहेत. रस्त्यात बस बंड पडणे, बस जळून खाक होणे अशा घटनाही कित्येक घडल्या आहेत. घाटामध्ये कचरा टाकणे ही नित्याचीच बाब झाली आहे. मात्र पालखी सोहळा वगळता इतर वेळी घाटातील स्वच्छतेकडे प्रशासन गांभीर्याने फारसे घेत नाही. सायंकाळच्या वेळी घाटात दरड कोसळल्याने नागरिकांना आणि पोलीस प्रशासनाला काही उपाययोजना करता आल्या. मात्र रात्रीच्या वेळी अशी घटना घडली किंवा अत्यंत रहदारीच्या काळात प्रकार घडून काही घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

रुंदीकरणाचे काम कधी सुरु होणार?

दिवे घाटातील वन खात्याच्या परवानग्या मिळून रस्त्याच्या रुंदीकरणाचे भूमिपूजनही करण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात कधी होणार? दिवे घाटातील काम सुरु करताना सासवडकडे येणारी सर्व वाहतूक कात्रज, बोपदेव घाट मार्गे पुरंदरला वळवावी लागणार आहे. मात्र बोपदेव घाटाची अवस्था त्यापेक्षा दयनीय आहे. घाटातील धोकादायक वळणे, अरुंद घाट यामुळे तिथेही वाहतूक करणे धोकादायक झाले आहे. त्यामुळे प्रथम बोपदेव घाटाचे काम केल्यानंतर दिवे घाटाचे काम करणे उचित ठरेल. मात्र एकदम दिवे घाटाचे काम सुरु करून वाहतूक बंद केल्यास बोपदेव घाटात मोठा त्रास सहन करावा लागणार आहे. त्यामुळे प्रशासनाने या गोष्टींची खबरदारी घेणे आवश्यक आहे.